विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

☐ वर्ष - २ रे ☐ अंक -२५६ वा ☐ अमरावती (महाराष्ट्र) ☐ शुक्रवार दि.८ नोव्हेंबर २०२४ ☐ संपादक - शुभांगी जोशी ☐ मुल्य - १ रु. ☐ पृष्ठ -६

महाविकास आघाडीच्या गाडीला ना चाक, ना ब्रेक, चालकाच्या सीटसाठीही...; धुळ्यातील सभेतून पंतप्रधान मोदींचे टीकास्त्र

विदर्भ प्रजासत्ताक
दि.८धुळे

महाविकास आघाडीच्या गाडीला ना चाक आहेत ना ब्रेक आहे. चालकाच्या सीटसाठीही तिन्ही पक्षात रस्सीखेच सुरू आहे. आम्ही जनतेला ईश्वरांचं रुप मानतो. जनतेची सेवा करण्यासाठी राजकारणात आलो आहे. मात्र, महाविकास आघाडीतील नेते जनतेला लुटण्यासाठी राजकारणात आले आहेत, अशी टीका पंतप्रधान मोदी यांनी केली आहे. पंतप्रधान मोदी यांनी धुळ्यातून महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराला सुरुवात केली. यावेळी बोलताना त्यांनी काँग्रेससह महाविकास आघाडीला लक्ष केलं.

पंतप्रधान मोदी म्हणाले, महाविकास आघाडीच्या नेत्यांनी प्रत्येक योजनेत भ्रष्टाचार केला. राज्यातील जनतेने त्यांचं अडीच वर्षांचे शासन बघितलं आहे. आधी त्यांनी सरकार लुटले, नंतर जनतेला लुटलं. त्यांनी मेट्रो प्रकल्प बंद केले, वाढवण बंदराचं काम थांबवण्याचा प्रयत्नही त्यांनी केला. तसेच समृद्धी महामार्गाला विरोध केला, अशा नेत्यांपासून आता महाराष्ट्रातील जनतेने सावध होण्याची गरज आहे.

महायुती सरकारच्या केंद्रस्थानी महिला आहेत. कारण महिलांचा विकासा झाला, तरच समाजाचा विकास होता. त्यामुळे आम्ही महिलांना केंद्रस्थानी ठेऊन अनेक योजना सुरू केल्या आहेत. महाराष्ट्रातील महायुती सरकारनेही लाडकी बहीण सारख्या अनेक योजना सुरु केल्या आहेत. लाडकी बहीण योनजेची चर्चा केवळ महाराष्ट्रातच नाही देशभरात सुरु आहे. मात्र, काँग्रेस आणि महाविकास आघाडी नेते ही योजना बंद करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यासाठी त्यांचे काही लोक न्यायालयातही जाऊन आले. त्यांना महिलांचा झालेला विकास पचणी पडत नाही, अशी टीकाही पंतप्रधान मोदी यांनी केली.

पुढे बोलताना, गेल्या अडीच वर्षात महायुती सरकारने विकासकामांचा नवा उच्चांक गाठला आहे. एकनाथ शिंदे यांचे नेतृत्वाखाली महाराष्ट्राला गौरव पुन्हा मिळाला आहे. भाजपा महायुती आहे, तर गती आहे आणि तरच महाराष्ट्राची प्रगती आहे, आम्ही मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्चा दिला. गेल्या अनेक वर्षांपासूनची मागणी आम्ही पूर्ण केली. दुसरीकडे काँग्रेसने राज्यात आणि केंद्रात सत्ता असताना मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याच्या मागणीकडे दुर्लक्ष केलं. हाच त्यांचा खरा चेहरा आहे, असेही ते म्हणाले.

काँग्रेस जातीजातीत भेद निर्माण करण्याच्या प्रयत्नात आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जेव्हा वंचितांच्या आरक्षणासाठी प्रयत्न करत होते. तेव्हा पंडित जवाहरलाल नेहरू त्याला विरोध करत होते. अनेक अडचणींचा सामना करून बाबासाहेबांनी दलित, आदिवासींना आरक्षण दिलं. त्यानंतर इंदिरा गांधींनीही एससी, एसटींना प्रतिनिधित्व मिळू नये यासाठी प्रयत्न केले. एससी, एसटी, ओबीसी हा समाज मजबूत झाला तर काँग्रेसच्या राजकारणाचं दुकान बंद होईल ते त्यांना माहिती आहे. त्यामुळे ते त्यांच्या आरक्षणाला विरोध करतात, अशी टीकाही त्यांनी काँग्रेसवर केली.

'महायुतीचे सरकार बनवायचे देवेंद्र भाऊंना विजयी करायचे'

अमित शाहांनी पहिलीच सभा गाजवली, विरोधकांवर तोफ डागली

विदर्भ प्रजासत्ताक
दि.८ शिराळा

'काँग्रेसचे अध्यक्षच सांगतात काँग्रेस जी आश्वासनं देतं ती काल्पनिक आहेत, ती कधीच पूर्ण होणार नाहीत. पण मी आज तुम्हाला सांगतो, मोदींनी जी आश्वासने दिलीत ती आम्ही पूर्ण केली आहेत. महाविकास आघाडीमध्ये शरद पवार यांना त्यांच्या मुलीला मुख्यमंत्री करायचे, उद्धव ठाकरेंना त्यांच्या मुलाला तर काँग्रेसमध्ये डझनभर नेते मुख्यमंत्रिपदासाठी इच्छुक आहेत, असा खोटक टोला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी महाविकास आघाडीवर केला. विधानसभा निवडणुकीसाठी केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी आज शिराळा येथे जाहीर सभा घेतली. यावेळी शाह यांनी विरोधकांवर निशाणा साधला.



शिराळा येथील सभेत बोलताना अमित शाह म्हणाले, मोदींच्या नेतृत्वात महाराष्ट्र नंबर वन होऊ शकतो. मी मागील महिन्यात महाराष्ट्रातील प्रत्येक भागात फिरलो, त्या सगळीकडे एकच चर्चा आहे, महायुतीचे सरकार बनवायचे, देवेंद्र भाऊंना विजयी करायचे आहे, केंद्रात भाजपाचे सरकार आहे, राज्यात महायुतीचे सरकार बनवा. हे दोन्ही सरकार महाराष्ट्राला नंबर एकचे राज्य बनवायचे काम करतील, असंही अमित शाह म्हणाले.

औरंगाबादचे नाव संभाजीनगर व्हायला पाहिजे, पण आघाडीवाले याला विरोध करत आहेत. उद्धव ठाकरेंचा याला विरोध आहे, शरद पवार तुम्ही कितीही जोर लावा आम्ही औरंगाबादला संभाजीनगर हे नाव देणारच, असा टोलाही शाह यांनी शरद पवार यांना लगावला. जम्मू काश्मीरमध्ये ३७० कलम पुन्हा आणण्याचा यांचा प्रयत्न आहे, पण आम्ही तो पुन्हा येऊ देणार नाही. काही दिवसापूर्वी मोदींनी वक्फ बोर्डाचे विधेयक आणले या विधेयकालाही या लोकांनी विरोध केला. आघाडीचे सरकार जर सत्तेत आले तर शेतकऱ्यांची जमीन वक्फ बोर्डाच्या नावावर होईल. आम्ही शेतकऱ्यांच्या जमिनीला हात लावू देणार नाही, असंही शाह म्हणाले.

शरद पवार यांच्यावर साधला निशाणा

अमित शाह म्हणाले, आम्ही अयोध्येत राम मंदिरात प्राणप्रतिष्ठा केली. यावेळी आम्ही शरद पवार आणि राहुल गांधींना बोलावले पण त्यांनी पुन्हा अयोध्येत येईन असं सांगितलं. पण अजूनही ते अयोध्येला गेलेले नाही, त्यांना त्यांच्या व्होट बँकेचे भीती वाटते म्हणून ते अजूनही अयोध्येला गेलेले नाही, असा टोलाही अमित शाह यांनी लगावला.

विजयाचा भंडारा उधळण्यासाठी सज्ज व्हा ! मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आवाहन

विदर्भ प्रजासत्ताक
दि.८भंडारा

नरेंद्र भोंडेकर यांना विकासाची प्रचंड तळमळ आहे. त्यांच्या डोक्यात नेहमी मतदारसंघाच्या विकासाचे प्रश्नच असतात. विकासाचे दुसरे नाव नरेंद्र असलेल्या या आमदाराची हॅट्रिक व्हायला हवी. त्यासाठी विजयाचा भंडारा उधळण्यासाठी सज्ज व्हा, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पवनी येथील जाहीर सभेत केले.

संभाजी चुटे रंगमंदिराच्या मैदानावर त्यांची जाहीर सभा झाली. यावेळी उमेदवार आमदार नरेंद्र भोंडेकर यांच्यासह महायुतीमधील घटक पक्षांचे पदाधिकारी प्रशांत भूते, राजेंद्र ब्राह्मणकर, नरेश बावनकर, किशोर पंचभाई, देवराज बावनकर, नामदेव सुरकर, राकाँचे तालुकाध्यक्ष विजय सावरबांधे, शैलेश मयुर, परमात्मा एक सेवक मंडळाचे कोटीराम मुंडले, विजय काटेखाये, महेंद्र निंबार्ते, नितीन कडव, राकाँ शहर अध्यक्ष हरिष तलमले, हरेश तलमले, माधुरी तलमले यांच्यासह अनेक

पदाधिकारी मंचावर प्रामुख्याने उपस्थित होते. जनसमूहाला आवाहन करताना ते म्हणाले, मी २३ तारखेच्या विजयाचे फटाके फोडण्यासाठी शुभेच्छा द्यायला आलो आहे. सभेला महिलांची प्रचंड गर्दी होती. त्याचा उल्लेख करून ते म्हणाले, आम्ही दिलेला शब्द पाळणारे आहोत. लाडकी वहीण योजनेचा सन्मान निधी दिवाळीपूर्वी दिला. निवडणुका होताच डिसेंबरमध्ये अग्रिम हप्ता दिला जाईल. सरकारने राज्यात राबविलेल्या योजनांची माहिती त्यांनी दिली. १० लाख युवकांना प्रशिक्षण देणारे हे सरकार आहे. शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. जे बोलतो ते करणारे आमचे सरकार आहे. धानाला यापूर्वी २० हजार रुपये बोनस होता.

तो २५ हजार रुपये देऊ, असे आश्वासन त्यांनी दिले. आम्ही अडीच वर्षात अनेक कामे केली, त्यांनी निव्वळ आमच्या विकासकामांमध्ये अडथळे घालण्याशिवाय दूसरे काय केले हे सांगावे, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

देवेंद्र फडणवीस गरजले ......

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज बडनेरा मतदार संघाचे आमदार रवी राणा यांच्या प्रचारार्थ विशाल जाहीर सभा घेतली या सभेत फडणवीस विरोधकांवर जोरदार बरसले. महायुतीच्या कलती झालेले विकास कामे जनतेसमोर मांडलीत व व रवी राणा यांना रेकॉर्ड ब्रेक मतांनी विजयी करा असे आवाहन मतदारांना केले. या सभेला लाडक्या बहिणींची मोठ्या प्रमाणात गर्दी होती हे विशेष .

उमेदवार दक्ष ! मोबाईल नाहीच, ओन्ली व्हॉटसअॅप कॉल

विदर्भ प्रजासत्ताक
दि.८ अमरावती

विधानसभा निवडणुकीत आचारसंहितेचा बडगा टळावा म्हणून उमेदवार व राजकीय पक्ष विशेष खबरदारी घेतात. सध्या सोशल मीडियाचा प्रचार करण्यासाठी उपयोग व दुरुपयोग पण होतो. म्हणून निवडणूक कार्यालय व पोलीस विभाग पण दक्ष असून त्यासाठी निगराणी पथक पण नेमल्या गेले आहेत. सोशल मीडिया हे प्रभावी माध्यम असले तरी त्यामुळे अडचण येवू शकते हे हेरून उमेदवार संवाद साधण्यासाठी कमालीची काळजी घेत आहे. फेसबुक, व्हॉटसअॅप , इंस्टाग्राम, एक्स, थ्रेड्स, स्नॅपचॅट अशी व विविध अस्त्रे या माध्यमात संवाद किंवा संदेश देण्यासाठी उपलब्ध आहेत.

पण सामान्य जनतेत व्हॉटसअॅप ॲप हेच सरसकट वापरल्या जात असल्याचे दिसून येते. मोबाईलवरून साधलेला संवाद व्हायरल झाल्याने भले भले अडचणीत आल्याची असंख्य उदाहरणे आहेत. मुद्दाम शेती किंवा विकास कामांची चर्चा करीत उमेदवारास ओघात भलताच प्रश्न विचारून तोंडघशी पाडायचे व तो संवाद व्हायरल करून संभ्रम निर्माण करण्याचा प्रकार माजी खासदार रामदास तडस यांच्याबाबत घडला होता. म्हणून आता ते सुद्धा या काळात व्हॉटसअॅपवरुन कॉल करू लागले आहे. आता राजकीय घडामोडीवर प्रतिक्रिया घ्यायची झाल्यास उमेदवार म्हणतो, थांबा व्हॉटसअॅप कॉल करतो. तंत्रस्नेही नसलेले काही मग पी. ए. कडून असा कॉल लावून घेत बोलतात. अशी ही धास्ती आता दिसून येत आहे.अनेकदा विविध मागण्या कार्यकर्ते उमेदवारास फोनवरून करतात. तेव्हा हे असे बोलणे अंगलट येवू शकते हे हेरून फोन कट करने केव्हाही चांगले, असे संवादचा वाईट अनुभव आलेल्या एका नेत्याने स्पष्ट केले. म्हणून सध्या सर्वत्र ओन्ली व्हॉटसअॅप हाच संवादसाठी परवलीचा कोड ठरला आहे. सविस्तर बोलायचे असेल तर मग उमेदवार म्हणतो प्रत्यक्ष भेटीतच बोलूया नं. चांगल्या माहितीपेक्षा खोटी माहिती ही वेगाने पसरते. युवा मतदारांची संख्या लक्षनीय असल्याने सोशल मीडियावरच राजकीय वादावादी रंगत असल्याचे चित्र आहे. त्यातून एकमेकांवार हल्ले झाल्याचा प्रकार हिंगणघाट येथे महिन्याभरपूर्वी घडला होता. म्हणून आता ॲडमिन पटकन चुकीची टीका डिलीट करीत खबरदारी घेत असल्याचे दिसून येते. पण सर्वात दक्ष व विशेष खबरदारी सर्वच राजकीय पक्षाचे उमेदवार घेत असून मोबाईलवर बोलणे बंद, असे बंधनच त्यांनी स्वतःला घालून घेतले आहे. एकदाचे ' निरोप ' पोहचले नाही तरी चालेल, पण व्हॉटसअॅप कॉल शिवाय बोलणे नकोच, अशी भूमिका सध्या उमेदवारांची आहे.

सुजलाम् सुफलाम् महाराष्ट्र माझा

"Matter related to 'Clock' symbol of the NCP is sub-judice in the Supreme Court

विदर्भ	मराठवाडा	पश्चिम महाराष्ट्र	उत्तर महाराष्ट्र	कोकण
• वैनगंगा-नळगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्प • 87 हजार कोटी रुपये • 7 जिल्हे • 10 लाख एकराला सिंचनलाभ	• पश्चिम वाहिनी वैतरणा व उल्हास उपखोऱ्यातील अतिरिक्त 54.70 टीएमसी पाणी मराठवाड्यात आणणार • दमणगंगा-एकदरे-गोदावरी नदीजोड प्रकल्प • 31513 एकर सिंचनलाभ • मराठवाडा वॉटर ग्रीड	• कृष्णा कोयना सिंचन प्रकल्प • टेंभू विस्तारीत उपसा सिंचन प्रकल्प • म्हैसाळ विस्तारीत जत उपसा सिंचन योजना • नीरा देवघर प्रकल्प • जिहे कठापूर योजना	• नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्प • नाशिक जिल्ह्यात 62562 एकराला सिंचनलाभ • जळगाव जिल्ह्यात 42067 एकराला सिंचनलाभ	• सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तिल्लारी प्रकल्प • 16500 एकराला सिंचनलाभ • मुंबई महानगर क्षेत्रासाठी देहरजी धरण • 25 लाख लोकसंख्येला पिण्याचे पाणी मिळणार • वाशिष्ठी नदीचे पाणी रायगड आणि मुंबईला

भाजप-महायुती आहे तर गती आहे
महाराष्ट्राची प्रगती आहे

महायुतीला मतदान करा आणि विजयी करा

भारतीय जनता पार्टी - महाराष्ट्र

Published By: Bharatiya Janata Party, Maharashtra | C.D.O Barrack No. 1, Nariman Point, Mumbai- 400020

संपादकीय ……

पुन्हा ट्रम्प सरकार!

अवघ्या जगाचे लक्ष लागून राहिलेल्या अमेरिकन राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीचा निकाल लागला असून, या देशाच्या ४७ व्या राष्ट्राध्यक्षपदी डोनाल्ड ट्रम्प यांची पुन्हा निवड झाल्यामुळे 'पुन्हा ट्रम्प सरकार' असे चित्र निर्माण झाले आहे. २०२० मधील निवडणुकीनंतर डेमोक्रॅटिक पक्षाचे जो बायडेन राष्ट्राध्यक्ष झाले, त्यावेळी ट्रम्प समर्थकांनी दंगल घडवली होती. यावेळी डेमोक्रॅटिकच्या उमेदवार आणि विद्यमान उपाध्यक्ष कमला हॅरिस यांनी वादविवादात ट्रम्प यांना नमवलेही होते. द्वेष व विभाजन यावर अमेरिकेने आता व्यक्त होण्याची गरज असल्याचेही आवाहन त्यांनी केले होते; पण शेवटी जनमताचा कौल हा मानावाच लागतो. यापूर्वी १३ अमेरिकन अध्यक्षांनी दोन टर्म पूर्ण केल्या आहेत. यामध्ये जॉर्ज वॉशिंग्टन, थॉमस जेफरसन, रोनाल्ड रेगन, बिल क्लिंटन, जॉर्ज डब्ल्यू बुश, बराक ओबामा यांचा समावेश आहे. फ्रँकलिन डी रुझवेल्ट यांनी तर अध्यक्षपदाच्या तीन टर्म पूर्ण केल्या आणि चौथ्यावेळी ते निवडून आले; पण थोड्या दिवसांत त्यांचे निधन झाले. अब्राहम लिंकन आणि रिचर्ड निक्सन दोनदा निवडले गेले. निक्सन यांना दुसरी टर्म पूर्ण होण्यापूर्वीच वॉटरगेट प्रकरणात राजीनामा द्यावा लागला. ट्रम्प यांचे एकूण वादग्रस्त व्यक्तिमत्त्व पाहता अमेरिकन इतिहासातील हे सर्वात मोठे राजकीय पुनरागमन आहे, असे म्हणावे लागेल.

जनतेने भक्कम जनादेश दिला असून, अमेरिकेस पुन्हा महान राष्ट्र बनवण्यासाठी मी झटेन, असे आश्वासन ट्रम्प यांनी विजयी सभेस संबोधित करताना दिले आहे. अमेरिकन संसदेत एकूण ५३८ लोकप्रतिनिधी निवडले जातात. त्यातील ज्या पक्षाचे किमान २७० लोकप्रतिनिधी निवडून येतात, त्या पक्षाचे हे सदस्य औपचारिकपणे अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडतात. समजा, एखाद्या पक्षाचे विशिष्ट राज्यांत निम्म्यापेक्षा अधिक लोकप्रतिनिधी निवडून आले, तर त्या राज्याची १०० टक्के मते त्या त्या पक्षाच्या तागडीत पडतात. भारत व अमेरिका यांच्या निवडणूक पद्धतींमध्ये मुळातच फरक आहे. शिवाय अमेरिकेत अध्यक्षीय पद्धत आहे, तर भारतात संसदीय लोकशाही आहे; पण अमेरिकेची निवडणूक ही केवळ अमेरिकेपुरती मर्यादित राहत नाही. याचे कारण, अमेरिका ही महासत्ता असून तिच्यात अनेक देशांचे हितसंबंध गुंतलेले आहेत. अमेरिकेची अर्थव्यवस्था जगात सर्वात मोठी आहे. आफ्रिका, युरोप, मध्य पूर्व आशिया अशा जगाच्या कोणत्याही भागातील राजकारण अमेरिकेवर अवलंबून असते. इस्रायल–पॅलेस्टाईन वा इस्रायल–इराक संघर्ष असो अथवा पाकिस्तान वा अफगाणिस्तानची समस्या, अमेरिकेची भूमिका महत्त्वपूर्ण असते.

२०१६ मध्ये ट्रम्प पहिल्यांदा अध्यक्ष झाले, तेव्हापासून या देशाच्या राजकारणाचे अधिकाधिक ध्रुवीकरण होत आहे. पहिल्या टर्ममध्ये ट्रम्प यांनी इराणची खोड काढल्यामुळे हा देश अण्वस्त्रांच्या आणखीच मागे लागला. आताही अमेरिका–मेक्सिकोची सीमा बंद करू, इमिग्रेशन अँड कस्टम्स एन्फोर्समेंट (आयसीई) या एजन्सीला जास्त निधी देऊ आणि कागदपत्रे नसलेल्या स्थलांतरितांना हाकलून देऊ अशी गर्जना ट्रम्प यांनी केली आहे; मात्र कमला यांनीही बेकायदेशीर स्थलांतरितांच्या विरोधात कडक कारवाई करण्याचे आश्वासन दिले होते. त्यासाठी अध्यक्षांना जादा अधिकार देण्याचे त्यांनी ठरवले होते; पण त्यामुळे डेमॉक्रॅटिकचे काही पारंपरिक मतदारगट मात्र नाराज झाले. गर्भपाताचा तसेच पुनरुत्पादनाचा अधिकार देण्याबाबत विधेयक आणण्याचे वचनही कमला यांनी दिले होते. अमेरिकेतील २१ राज्यांनी गर्भपातावर बंदी वा नियंत्रणे आणली आहेत. ट्रम्प यांनी याबाबत संदिग्ध भूमिका घेतली असून, कमला यांना महिलांचा मोठा पाठिंबा मिळाला, तो त्यांच्या स्त्रीवादी भूमिकेमुळे. बायडेन यांच्या राजवटीत बेरोजगारीचा दर ६.४ टक्क्यांवरून ४.१ टक्क्यांवर आला. तसेच महागाईही ९ टक्क्यांवरून २.४ टक्क्यांवर आली, तरीही प्रमुख जीवनावश्यक वस्तूंची भाववाढ लोकांना झळ पोहोचवत आहे. रिपब्लिकनने भाववाढ आटोक्यात आणण्याचे तसेच तेल खोदाई वाढवणे आणि प्रचंड प्रमाणात कर कपात करण्याचे आश्वासन दिले आहे.

अमेरिकेत देशांतर्गत उत्पादन वाढवण्यासाठी ट्रम्प विविध प्रोत्साहने देणार असून, त्यामुळे व्यापारी व उद्योजक त्यांच्याकडे आकर्षित झाले आहेत; मात्र ट्रम्प यांची पर्यावरणाबद्दलची वक्तव्ये धक्कादायक आहेत. भविष्यकाळात समुद्रपातळी वाढेल, या पर्यावरणवाद्यांच्या भाकिताची ते टिंगल उडवत असतात. पूर्वकाळात ट्रम्प यांनी हवामानविषयक पॅरिस करारातून अंग काढून घेतले होते. तसेच पर्यावरण संरक्षणाचे अनेक कायदे मोडीत काढले होते. त्यांच्या कारकिर्दीत अमेरिकेच्या कार्बन उत्सर्जनाची पातळी वाढली होती. या उलट कमला यांनी नवीकरणीय ऊर्जेसाठी अब्जावधी डॉलरची मदत केली होती, तसेच इलेक्ट्रिक वाहनांसाठी कर उत्तेजन दिले होते. कमला यांनी युक्रेनला सहकार्य करण्याची भूमिका घेतली होती, तर युक्रेन असो वा कुठलाही देश, तेथील संघर्षापासून अमेरिकेने अलिप्त राहावे, अमेरिकेने केवळ स्वहित बघावे ही ट्रम्प यांची भूमिका आहे. आता ते अध्यक्ष म्हणून निवडून आले

महागाई, शेती प्रश्नावरून आघाडी आक्रमक

युतीची मदार वैयक्तिक लाभाच्या योजनांवरनिवडणुकीला चढतोय रंग

उमेदवारांच्या जनसंपर्कासोबतच राजकीय पक्षांकडून प्रचार सभांवर भर

विदर्भ प्रजासत्ताक

दि.८अमरावती– महायुती आणि महाविकास आघाडी जिल्ह्यात तिनही मतदार संघात मैदानात उतरली आहे. जनसामान्याचे गायब झालेले प्रश्न आता पुन्हा राजकीय प्रचाराच्या धुराव दिसणार आहेत. लोकसभेवेळी प्रचारात असलेले महागाई, बेरोजगारी, शेतीचे प्रश्न यासह अनेक मुद्दे याही वेळीही कायम आहेत. त्यावरून महाविकास आघाडी आक्रमक आहे, तर महायुतीची मदार निवडणुकीच्या तोंडावर जाहीर झालेल्या योजनावर दिसत आहे.

मंगळवारपासून आठही विधानसभा मतदारसंघात तडाख्यात प्रचार सुरू झाला आहे. महाविकास आघाडी आणि महायुतीच्या उमेदवारांकडून कॉर्नर सभा तसेच नेत्यांच्या जाहीर सभा व्हायला लागल्या आहेत. १३ दिवस राहणाऱ्या या प्रचारकाळात पक्षातील वरिष्ठ नेत्यांच्या सभाही जिल्ह्यात होवू घातल्या आहेत.आज पर्यंत मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ,मनसे प्रमुख राज ,शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या सभेने शहरात राजकीय वातावरण तापायला सुरुवात झाली आहे.

१० वीच्या परिक्षेची आवेदनपत्रे सादर करण्यास मुदतवाढ

शाळा प्रमुखांना १९ नोव्हेंबरपर्यंत विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरता येणार

विदर्भ प्रजासत्ताक

दि.८अमरावती– माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रुवारी–मार्च २०२५ मध्ये होणाऱ्या परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या नियमित विद्यार्थ्यांची परीक्षेची आवेदनपत्रे शाळा प्रमुखांच्या माध्यमातून ऑनलाईन प्रद्धतीने भरण्यास १९ नोव्हेंबर २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून ३० नोव्हेंबर २०२४ पर्यंत विलंब शुल्कासहित आवेदनपत्र भरता येणार आहेत.

माध्यमिक शाळांनी नियमीत विद्यार्थ्यांच्या परिक्षेची आवेदनपत्रे सरल डाटाबेस वरून ऑनलाईन पद्धतीने भरण्यासह पुनर्परिक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय, आयटीआयचे (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे ट्रान्सफर ऑफ क्रेडिट घेणारे विद्यार्थी) विषय घेऊन प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षेची आवेदनपत्रे ु.ारहरहीशलेरीव.ळप या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पद्धतीने शाळा प्रमुखांमार्फत ७ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर २०२४ पर्यंत भरावयाची होती. आता यास ६ ते १९ नोव्हेंबर २०२४ दरम्यान नियमित शुल्कासह आवेदन करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. तर विलंब शुल्कासह आवेदन २० ते ३० नोव्हेंबर २०२४ दरम्यान करता येणार असल्याचे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करणाऱ्या जवस पिकाची कशी कराल लागवड

दि.७विदर्भ प्रजासत्ताक

राज्यातील विदर्भ आणि मराठवाडा विभागात जवस हे पिक रब्बी हंगामात घेतले जाते. जवसाच्या ८० टक्के उत्पादनाचा तेल काढण्याकरिता व २० टक्के धागा काढण्याकरिता उपयोग केला जातो.

जवसाच्या अधिक उत्पादनासाठी शुद्ध व जातिवंत बियाणे असणे गरजेचे असते जसे की 'शुद्ध बिजोपोटी फळे रसाळ गोमटी' ह्या कथनाप्रमाणे जातिवंत बी हे फार महत्वाचे आहे. कारण पिकाची वाढ व उत्पादन हे वापरलेल्या बियाणावरच अवलंबून असते.

जमीन– जवस हे पीक मध्यम ते भारी, ओलावा टिकवून ठेवणारी, उत्तम निचऱ्याची, आम्ल–विम्ल निर्देशांक ५ ते ७ दरम्यान असणाऱ्या जमिनीत लागवडीस उत्तम असते.

हवामान– जवस हे पीक मुख्यत्वे रब्बी हंगामातील असून या पिकाच्या वाढीसाठी २० ते ३० अंश से. तापमान आवश्यक असते. या पिकास फुलोरा व त्यानंतरच्या अवस्थेत जास्त कोरडे व उच्च तापमान (३२ अंश से.) असल्यास उत्पादनामध्ये लक्षणीय घट संभवते.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

पूर्वमशागत–प्रथम जमिनीची खोल नांगरट करून एक कुळवाची पाळी द्यावी. त्यानंतर काडीकचरा वेचून घेऊन शेवटच्या वखरणीपूर्वी उपलब्धतेनुसार हेक्टरी १० गाड्या चांगले कुजलेले शेणखत पसरुन मिसळावे.

पेरणीची वेळ आणि लागवडीचे अंतर– कोणत्याही पिकाच्या चांगल्या उत्पादनासाठी वेळेवर पेरणी करणे फार महत्वाचे असते. कारण उत्पादन हे पर्यावरणीय परिस्थितीवर अवलंबून असते. जवसाची पेरणी ऑक्टोबरच्या मध्यापासून नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पेरणी करता येते. दोन ओळींतील ३० सेंमी किंवा ४५ से.मी. अंतर ठेवावे. तर दोन रोपांमधील अंतर १० सें.मी. ठेवावे. पेरणी ५ ते ७ सेंमीपेक्षा अधिक खोल करू नये.

जवस लागवड तंत्र

बियाण्याचे प्रमाण– जवसाचे अधिक उत्पादन मिळण्यासाठी प्रति हेक्टरी ४.५ ते ५ लाख रोपांची संख्या असणे आवश्यक आहे. त्यासाठी शिफारस केलेले शुद्ध प्रमाणित, टपोरे व निरोगी बियाणे प्रति हेक्टरी १० ते १५ किलो वापरावे.

बीजप्रक्रिया– मर व करपा या रोगांसाठी जवसाचे पीक संवेदनशील असते. त्यामुळे प्रति किलो बियाण्याला थायरम ३ ग्रॅम व कार्बेन्डाझिम २ ग्रॅम याप्रमाणे बुरशीनाशकांची प्रक्रिया पेरणीपूर्वी करावी

खत व्यवस्थापन– खते जवसाच्या उत्पादनवाढीस महत्वाचे कार्य करीत असतात. कोरडवाहू जवसाकरिता ५० किलो नत्र, २५ किलो स्फुरद प्रति हेक्टरी पेरणीच्या वेळेस द्यावे. तसेच बागायती लागवडीसाठी ६० किलो नत्र, ३० किलो स्फुरद प्रति हेक्टरी द्यावे, अर्धा नत्र (३० किलो) संपूर्ण स्फुरद (३० किलो) पेरणीच्या वेळी द्यावे, तसेच राहिलेल्या अर्ध्या नत्राची मात्रा (३० किलो नत्र) ३० ते ३५ दिवसांनी द्यावी.

पाणी व्यवस्थापन– जवस हे पीक पाण्यास उत्तम प्रतिसाद देणारे आहे. या पिकास दोनदा पाणी देणे आवश्यक आहे. पहिले पाणी पीक फुलोऱ्यात असताना म्हणजेच ४० ते ४५ दिवसांनी आणि दुसरे पाणी ६५ ते ७० दिवसांनी (बोंडे धरण्याच्या वेळेस) द्यावे.

आंतरमशागत– जवसाचे पीक पहिल्या ३५ दिवसांपर्यंत तणविरहित ठेवावे. पेरणीनंतर २५ दिवसांनी पहिली डवरणी करावी.

आरोग्य संपदा आहार

सिगरेट ओढत नसला तरी फुफ्फुसांचा कर्करोग होतो का?

दि.८ विदर्भ प्रजासत्ताक

दरवर्षी नोव्हेंबर हा महिना फुफ्फुसांच्या कर्क रोगाविरोधातील जनजागृतीसाठीचा असतो. लोकांमध्ये फुफ्फुसांच्या कर्क रोगाबद्दल जनजागृती व्हावी, संशोधनाला पाठबळ द्यावे हा या महिन्याचा उद्देश असतो. फुफ्फुसांच्या कर्क रोगाचे धोके, लक्षणं, उपाचार यांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न या महिन्यात केला जातो. जगभारात फुफ्फुसांचा कर्क रोग होण्याचे प्रमाण फार जास्त आहे, त्यामुळे त्याबद्दल जनजागृती होणे आवश्यक आहे.

या वर्षीची संकल्पना काय आहे?

ही वर्षीची संकल्पना आहे. ज्यांना हा आजार झालेला आहे, त्यांना सामुदायिक पाठबळ मिळावे आणि या आजाराबद्दल एकत्रितपणे लढा द्यावा, या संकल्पनेचा हेतू आहे.

नोव्हेंबर हा महिना म्हणून पाळला जाण्याती सुरुवात सन २०००च्या आधी सुरू झाली. अमेरिकन लंग कॅन्सर असोसिएशन आणि लंग कॅन्सर फाऊंडेशन ऑफ अमेरिका यांनीही ही सुरुवात केली. फफ्फुसाच्या कर्क रोगाकडे अधिकाधिक लक्ष दिले जावे, याबद्दल जनजागृती व्हावी असा हेतू या संस्थांचा होता. सुरुवातीला नोव्हेंबर महिन्यात एक आठवडा विविध उपक्रम राबवले जात असत, हळूहळू पूर्ण महिना फुफ्फुसांच्या कर्करोगांबद्दल जनजागृतीसाठी विविध कार्यक्रम घेतले जाऊ लागले.

या महिन्याचे महत्त्व

फुफ्फुसांचा कर्करोग सुरुवातीच्या टप्प्यांत लक्षात येत नाही, त्यामुळे हा आजार जेव्हा बळवतो, तेव्हाच याचे निदान होण्याचे प्रमाण जास्त आहे. सहाजिकच यामुळे उपचारांवर मर्यादा येतात. त्यामुळे सुरुवातीची टप्प्यात हा आजार कसा ओळखता येईल आणि त्याचे निदान लवकरात लवकर कसे होईल, हा कळीचा मुद्दा आहे. मधून याबद्दल जनजागृती केली जाते. तसेच कर्करोगाबद्दल सामाजात नकारात्मक भावना आहे आणि हा आजार झालेल्यांनाच कलंकित केले जाते, याविरोधातही या महिन्यात जनजागृती केली जाते. धुम्रपान करणाऱ्यांना फफ्फुसाचा कर्करोग होण्याची शक्यता जरी जास्त असली तरी जे धुम्रपान करत नाहीत, त्यांनाही हा आजार होताना दिसतो.

जे सिगारेट ओढत नाहीत,
त्यांनाही फुफ्फुसाच्या कर्करोगाचा धोका

फुफ्फुसाच्या कर्करोगाचा धोका टाळण्यासाठी काय केले पाहिजे?

धुम्रपान बंद करा – धुम्रपान बंद केल्याने फुफ्फुसाच्या कर्करोगाची शक्यता मोठ्या प्रमाणावर कमी होते. हे व्यसन बंद करण्यासाठी तुम्ही निकोटिन रिप्लेसमेंट थेरपी, सामुपदेशन, सपोर्ट ग्रुप यांची मदत घेऊ शकता.

रेडॉन एक्सपोजर – रेडॉन हे नैसर्गिकरीत्या उत्सर्जित होणारा किरणोत्सर्ग आहे. यापासून सावध राहिले पाहिजे.

अजबेस्टॉज आणि डिझेलच्या ज्वलनामुळे निर्माण होणारे उत्सर्ग कर्करोगांसाठी कारणीभूत ठरतात.

जेवणात अँटीऑक्सिडंट, व्हिटॅमिन, मिनरल अधिक असणाऱ्या पदार्थांचा समावेश असावा.

आठवड्यात किमान १५० मिनिटे व्यायाम करणे आवश्यक आहे.

मद्यसेवन मर्यादित ठेवा.

हवेच्या प्रदूषणापासून स्वतःचा बचाव करा.

कुटुंबास फुफ्फुसांच्या कर्करोगाचा इतिहास असेल तर तुम्हाला अधिक सजग राहिले पाहिजे.

आदर्श आचार संहितेमुळे ११ नोव्हेंबरचा विभागीय लोकशाही दिन रद्द

विदर्भ प्रजासत्ताक

दि.८अमरावती– विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर आदर्श आचारसंहिता लागू असल्याने विभागीय लोकशाही दिन व महिला लोकशाही दिनाचे आयोजन माहे नोव्हेंबर या महिन्यात आयोजित करता येणार नाही,

तसेच सामान्य नागरिकांनी तसेच महिलांनी त्यांच्या विभागीय लोकशाही दिनामधील महिला लोकशाही दिना मधील तक्रार अर्ज तालुका,जिल्हा,महानगरपालिका लोकशाही दिनामध्ये सादर केल्या नंतर नमुन्यात माहे डिसेंबर महिन्यातील लोकशाही दिनाकरिता लोकशाही दिनाच्या १५ दिवस आधी दोन प्रती पाठवाव्यात. तसेच सदर तक्रार dcgamravatigmail.com/ dcgšamravatire diffmail.com या ई–मेलवर विहीत नमुन्यात पाठविण्यात याव्यात,अशाही सूचना विभागीय आयुक्तालयाद्वारे देण्यात आल्या आहेत.

विद्यार्थ्यांनी आपत्ती व्यवस्थापनाची सामुहिक जबाबदारी स्वीकारावी – कमांडन्ट संतोष सिंग

विद्यापीठात आव्हान चान्सलर्स ब्रिगेड-२०२४ चे थाटात उद्घाटन संपन्न

विदर्भ प्रजासत्ताक

दि.८अमरावती – देशामध्ये नैसर्गिक आपत्तीसह विविध आपत्ती घडण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. अशा आपत्तीचा सामना करण्यासाठी, त्यातून समाजाचे जीवीत व इतर हानीपासून होणारे नुकसान कमी करण्यासाठी विद्यार्थ्यांना आव्हान स्पर्धेच्या माध्यमातून रा.से.यो. विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिल्या जात असून विद्यार्थ्यांनी आपत्ती व्यवस्थापनाची सामुहिक जबाबदारी स्वीकारावी, असे प्रतिपादन एन.डी.आर.एफ. पुणेचे कमांडन्ट श्री संतोष सिंग यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात 'आव्हान – २०२४' चान्सलर्स ब्रिगेड या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ आपत्ती पूर्वतयारी प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटनीय भाषण करतांना श्री संतोष सिंग बोलत होते. व्यासपीठावर कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रविंद्र कडू, डॉ. भैय्यासाहेब मेटकर, डॉ. व्ही.एच. नागरे, डॉ. नितीन चांगोले यासह विविध विद्यापीठांचे पदाधिकारी, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, रा.से.यो. संचालक डॉ. निलेश कडू उपस्थित होते.

शिबिराचे उद्घाटन झाल्याची घोषणा करुन सिंग पुढे म्हणाले, राज्यपाल महोदयांनी २०११ पासून हा प्रशिक्षण कार्यक्रम सुरू केला आहे. देशासमोर विविध आव्हाने आहेत. विविध आव्हानांचा सामना करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांनी आपल्या खांद्यावर घेण्याची गरज असून त्यासाठी त्याला आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देऊन सक्षम बनविण्यात येत आहे. या शिबीरात ज्ञानासह प्रात्याक्षिकांचे मार्गदर्शन होणार असल्यामुळे प्रशिक्षित विद्यार्थी उत्तमरितीने होवून भविष्यात उद्भवणा–या विविध आव्हानांचा सामना आमचे विद्यार्थी सक्षमपणे करु शकतील, असे त्यांनी सांगितले.

जीवनात येणारी आव्हाने धैर्याने स्वीकारा–कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

जीवन जगत असतांना अनेक संकटे, आव्हानांना तोंड द्यावे लागते, मात्र अशा कठीण परिस्थितीतच खरी परीक्षा असते व अशी आव्हाने विद्यार्थ्यांनी धैर्याने स्वीकारावीत. नैसर्गिक आपत्तींना नेहमीच तोंड द्यावे लागते आहे. अशा परिस्थितीत आव्हान या उपक्रमाचे महत्वची तितकेच आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या दहा दिवसांच्या प्रशिक्षण शिबीरामध्ये प्रशिक्षित होऊन आपापल्या विद्यापीठांमध्ये असलेल्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करावे, अशा प्रकारचे उपक्रम अमरावती विद्यापीठाकडून विद्यापीठाच्या स्थापनेपासूनच राबविले जात आहेत. त्यामुळेच अमरावती विद्यापीठाचा नावलौकीक आहे व पुढेही अशाच प्रकारचे उपक्रम राबविले जातील, असे अध्यक्षीय भाषणातून कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी आव्हान केले.

व्यवस्थापन परिषदेच्यावतीने सदस्य डॉ. रविंद्र कडू प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना म्हणाले, १९९३ साली महाराष्ट्रातील लातूर येथे जेव्हा भूकपाने हानी झाली, त्यावेळी आम्ही अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्यावतीने लातूर येथे जावून मदतकार्य केले होते. परंतु त्यावेळी अद्ययावत साधनसामुग्री देखील नव्हती. आपापल्या परिने सर्वांनी त्यावेळी भूकंपपीडितांना मदतकार्य केले. त्यामुळे या प्रशिक्षण शिबीरामध्ये विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण घेऊन आपत्तीवेळी आपले कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन त्यांनी केले.–

विदर्भ प्रजासत्ताक
कुरुक्षेत्र महाराष्ट्र
https://epaper.vidarbhaprajasattak.com
शुक्रवार दि. ८ नोव्हेंबर २०२४

७० हजार रुग्णांसाठी बच्चू कडू ठरले 'देवदूत', दुर्धर आजारांवर मुंबईत मोफत शस्त्रक्रिया

विदर्भ प्रजासत्ताक

दि.८अमरावती– स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानंतर सुद्धा देशात आरोग्याचा प्रश्न अधिक भीषण झालेला आहे.शासनाच्या वतीने गोरगरीब रुग्णांसाठी महात्मा फुले आरोग्यदायी योजना राबविल्या जातात मात्र दुर्धर आजार असला की या योजनाही फोल ठरतात.अश्यातच अमरावती जिल्ह्यात ७० हजार रुग्ण दुर्धर आजाराने ग्रासले असतांना अश्यावेळी बच्चू कडू यांनी रुग्णांना जवळचा एक रुपया सुद्धा खर्च न येऊ देता लाखो रुपयांचा मोफत उपचार तोही मुंबईत करून दिला. त्यामुळे त्या ७० हजार रुग्णांसाठी बच्चू कडू आजही देवदूत समजले जातात. सर्वसामान्य लोकांचे प्रतिनिधित्व करणारे नेते प्रत्यक्षात लोकप्रतिनिधी झाले की जबाबदाऱ्या विसरतात. आरोप, प्रत्यारोप आणि ईतर विषयात त्यांना जास्त रस असतो परंतु अचलपूर मतदार संघाचे आ.बच्चू कडू याला अपवाद असून प्रहार जनशक्ती पक्षाच्या माध्यमातून बच्चू कडू दरवर्षी दिव्यांग, निराधार, गोरगरीब रुग्णांच्या दुर्धर आजारांवर त्यांना मुंबईत मोफत उपचार करून देतात. विशेष म्हणजे बच्चू कडू यांचे मुंबई येथील प्रहार रुग्णसेवक प्रताप तायडे,गोलू सुळे हे सर्व रुग्णांची काळजी घेऊन त्यांची मुंबईत सर्व व्यवस्था करून देतात. बच्चू कडू जेव्हापासून लोकप्रतिनिधी आहेत तेव्हापासून आजपर्यंत अमरावती जिल्ह्यातील ७० हजार रुग्णांवर मुंबईतील टाटा मेमोरियल,अंबानी, रिलायन्स, कोकिळाबेन, हिंदुजा, भाटिया, लीलावती, जेजे नायर, केईएम, सैफी, ब्रीच कँडी,बॉम्बे हॉस्पिटल, एच.आर.सी.सी यांसारख्या महागड्या व आधुनिक सेवा असणाऱ्या रुग्णालयात हृदय शस्त्रक्रिया,कॅन्सर,ब्रेन, ट्युमर,किडनी,लिव्हर,गुडघे प्रत्यारोपण आदी असाध्य आजारांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या.७ लाख ते ४० लाख रुपये एवढा खर्च असलेला उपचार बच्चू कडू यांच्या माध्यमातून झाल्याने अनेक रुग्णांना आज जीवनदान मिळाले आहे. जिल्ह्यातील कोणत्याही गावात जर कोणत्या सामान्य व्यक्तीला दुर्धर आजार झाला तर त्या मतदार संघातील लोकप्रतिनिधींपेक्षा रुग्ण बच्चू कडू यांच्याशी किंवा प्रहार रुग्णसेवकांच्या मदतीने उपचार करून घेतात ही सत्य बाब आहे.बच्चू कडू यांची रुग्णवाहिका चळवळ सुद्धा यामध्ये सहभागी असून मतदार संघातील कोणत्याही गावात रुग्णांना रुग्णवाहिकेची मदत लागल्यास ती निशुल्क उपलब्ध करण्यात येते.

RATE
10/10
I AM A PROUD

रक्ताची गरज भासल्यास तातडीने रक्तदान शिबिराचे आयोजन

मुंबई सारख्या ठिकाणी रुग्णसेवा करत असतांना रुग्णसेवकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.यामध्ये अनेकवेळा रक्ताची अडचण निर्माण होते अश्यावेळी रुग्णसेवक त्या रुग्णालयात रक्तदान शिबिराची व्यवस्था करून रुग्णांना तातडीने रक्ताचा पुरवठा करतात.खुद्द बच्चू कडू यांनी ११५ वेळा रक्तदान करून अनेक कार्यक्रमात बच्चू कडू यांची रक्ततुला करण्यात आल्याने त्या रक्त पिशव्यांचा वापर सुद्धा रुग्णांच्या उपचारासाठी करण्यात येतो.–

रुग्णसेवकांची प्रामाणिक सेवा

या आरोग्यसेवेमध्ये,शुभम भेंडे अमरावती,समर्थ डवरे अमरावती,रेहान अमरावती,उमेश खापरे नागपुर,प्रताप तायडे मुंबई,गोपाल सुळे मुंबई,विकास दांडगे वर्धा,गजु कुबडे वर्धा,अमोल आव्हाड सावगी मेघे या रुग्णसेवकांची प्रामाणिक सेवा मिळत आहे. रुग्णांच्या जेवणाच्या व निवासाच्या व्यवस्थेपासून तर सर्व शासकीय योजनांचा लाभ या रुग्णसेवकांच्या माध्यमातून सदैव रुग्णांना मिळतो.

निशुल्क रुग्णवाहिकेची रुग्णांना मदत

२००४ पासून अविरत रुग्णवाहिका सेवा सुरू आहे.या रुग्णवाहिकेचे पहिले सारथी देविदास गोरले हे होते तर आज अचलपूर व चांदुर बाजार तालुक्यात तब्बल १२ पेक्षा अधिक रुग्णवाहिका कार्यरत आहेत.आजवर तीन हजार पेक्षा अधिक रुग्णांचे प्राण वाचविण्यात या रुग्णवाहिकांना यश मिळाले आहे. या सेवाकार्यात हेमंत कोंडे,झाबिउल्ला खान,तुषार वानखेडे,उध्दव ठाकरे,प्रज्वल हडोले,नरेंद्र उइके,शशी भोंगाडे,शुभम धर्मे,राधे डकरे,अमोल शेळके,प्रशात नागपुरे या रुग्णवाहिका सारथींची मोठी मदत मिळत आहे.

मतदानासाठी २० नोव्हेंबर रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर

विदर्भ प्रजासत्ताक

दि.८ अमरावती , भारत निवडणूक आयोगाने १५ ऑक्टोबर २०२४ रोजी जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार महाराष्ट्र राज्यातील विधानसभा सार्वत्रिक-२०२४चा कार्यक्रम जाहीर केला आहे. या निवडणुकीचे मतदान दि. २० नोव्हेंबर, २०२४ रोजी होणार आहे. या निवडणुकीमध्ये १८ वर्षावरील नोंदणी झालेल्या सर्व नागरिकांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी लोकप्रतिनिधित्व कायदा, १९५१ मधील कलम १३५ (ब) नुसार उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या दि. २४ ऑक्टोबरच्या शासन परिपत्रकानुसार हिंगोली जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघात २० नोव्हेंबर रोजी मतदान करण्यास सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. या दिवशी मोठ्या संख्येने मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रातील कोणत्याही व्यवसायात, व्यापारात, औद्योगिक उपक्रमात किंवा इतर कोणत्याही आस्थापनेमध्ये कार्यरत असलेल्या आणि राज्याच्या विधानसभेच्या निवडणुकीत मतदान करण्याचा अधिकार असलेल्या प्रत्येक व्यक्तीला मतदानाच्या दिवशी सुट्टी दिली जाईल. सदर सुट्टी उद्योग विभागांतर्गत येणाऱ्या सर्व उद्योग समूह, महामंडळ, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना इत्यादींना लागू राहील.मतदानाच्या दिवशी सर्वसाधारणपणे मतदारांना त्यांच्या मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी सुट्टी देण्यात येते किंवा कामाच्या ठिकाणी योग्य ती सवलत देण्यात येते. मात्र गेल्या काही निवडणुकांमध्ये संस्था, खासगी आस्थापना इत्यादी भरपगारी सुट्टी किंवा सवलत देत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे अनेक मतदारांना मतदानापासून वंचित राहावे लागते. ही बाब लक्षात घेऊन या विधानसभा निवडणुकीत कामगार, अधिकारी व कर्मचाऱ्यांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मतदानाच्या दिवशी भरपगारी सुट्टी मिळणार आहे.ही सुट्टी उद्योग विभागांतर्गत येणाऱ्या सर्व उद्योग समूह, महामंडळ, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना आदींना लागू राहणार आहे. अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचाऱ्यांना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर, मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टीऐवजी कमीत कमी दोन तासांची सवलत मिळणार आहे.

कोणत्याही परिस्थितीत मतदारांना मतदानासाठी किमान दोन तासांची सवलत मिळेल, याची दक्षता संबंधित आस्थापनांनी घेणे आवश्यक आहे. उद्योग विभागांतर्गत येणारे सर्व महामंडळ, उद्योग समूह, कंपन्या व संस्थांमध्ये, औद्योगिक उपक्रम इत्यादींच्या आस्थापनांनी या सूचनांचे योग्य अनुपालन होईल, याची काटेकोरपणे खबरदारी घ्यावी. मतदारांकडून मतदानाकरिता योग्य ती सुट्टी अथवा सवलत प्राप्त झाल्याने मतदान करता येणे शक्य न झाल्याबाबत तक्रार आल्यास त्यांच्याविरुद्ध योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी सौरभ कटियार यांनी दिले आहेत.

वलगावच्या सभेत माजी मुख्यमंत्र्यांचे चिरंजीव चक्क सामान्यांच्या खुर्चीत!

विदर्भ प्रजासत्ताक

दि.८अमरावती : – माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या प्रचार सभांचा धडाका सुरू झाला आहे. पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ ते ठिकठिकाणी सभा घेत आहेत. उद्धव ठाकरे यांचे ज्येष्ठ सुपुत्र आदित्य ठाकरे हे मुंबईतील वरळी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवित आहेत. पण, यावेळी त्यांचे कनिष्ठ चिरंजीव तेजस ठाकरे यांचेही नाव चर्चेत आले आहे. उद्धव ठाकरेंनी गुरूवारी सायंकाळी वलगाव येथे तिवसा मतदारसंघातील काँग्रेसच्या उमेदवार यशोमती ठाकूर यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेला संबोधित केले. मंचासमोरील एका खुर्चीवर बसलेले पांढरा शर्ट घातलेले तेजस ठाकरे सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. मंचावर नेत्यांच्या रांगेत बसण्याऐवजी तेजस ठाकरे यांनी सामान्यांप्रमाणे श्रोत्यांच्या खुर्चीवर बसणे पसंत केले.

यशोमती ठाकूर यांनी आपल्या भाषणात या घटनेचा उल्लेख केला. त्या म्हणाल्या, माजी मुख्यमंत्र्यांचा मुलगा सर्वसामान्यांप्रमाणे खुर्चीवर बसून शांतपणे आमची भाषणे ऐकत आहेत. ते तर सहजपणे मंचावर वावर करू शकले असते. पण, हे ठाकरे कुटुंबीयांचे संस्कार आहेत. जनतेसोबत ते जुळलेले आहेत, अशा शब्दात त्यांनी तेजस ठाकरे यांचे कौतुक केले. त्यांच्या या वक्तव्यानंतर सर्वांच्या नजरा तेजस ठाकरे यांच्याकडे वळल्या. तेजस ठाकरे हे वलगावच्या सभेपुर्वी दर्यापूर येथे आयोजित सभेलाही पूर्णवेळ उपस्थित होते. बेलोरा विमानतळावर त्यांचे उद्धव ठाकरे यांच्यासमवेत आगमन झाले, तेव्हा तेजस ठाकरे यांच्यासोबत छायाचित्र काढण्यासाठी अनेक जण सरसावले.

तेजस ठाकरे हे वन्यजीव संवर्धनासाठी काम करतात. त्यांचे वन्यजीव प्रेम अनेकदा अधोरेखित झाले आहे. २०१४ मध्ये त्यांनी एका पालीच्या प्रजातीचा शोध घेतला होता. ही पाल वेगळ्या प्रजातीची आहे का, यावर संशोधन झाले आणि अखेर प्राणी शरीर शास्त्राच्या नियमानुसार तिला 'मॅगनिफिसंट डवार्फ गेको' असे नाव देण्यात आले. तेजस आणि त्यांच्या चमूने या पालीवर तयार केलेला शोधनिबंध 'झुटाक्सा' या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या जर्नलमध्येही प्रसिद्ध झाला आहे.

दोन वर्षांपूर्वी त्यांनी पश्चिम घाटातच सापाची एक नवी प्रजाती शोधून काढली होती आणि ठाकरे यांच्याच नावावरून त्याला 'बोईगा ठाकरेयी' असे नाव देण्यात आले होते. गोड्या पाण्यातल्या खेकड्याचीही दुर्मिळ जात त्यांनी आणि त्यांच्या टीमने शोधून काढली होती. तेजस ठाकरे हे उद्धव ठाकरे यांच्या सभांना उपस्थित राहून नियोजन करीत असल्याने नजीकच्या काळात ते राजकारणात सक्रीय होणार का, याची चर्चा रंगली आहे.

जिल्ह्यात गुरूवारपासून तीन दिवस गृहमतदान

ज्येष्ठ नागरिक, दिव्यांगांना सुविधा, २,८६२ मतदार मतदानासाठी पात्र

विदर्भ प्रजासत्ताक

दि.८अमरावती,– निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग व्यक्तींना घरून मतदान करण्याची सुविधा देण्यात आली आहे. जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदारसंघात गुरूवार, दि. १४ नोव्हेंबरपासून गृहमतदानास सुरूवात होणार आहे. सलग तीन दिवस शनिवार, दि. १६ नोव्हेंबरपर्यंत हे मतदान होणार आहे.

निवडणूक आयोगाने ८५ वर्षावरील नागरिक आणि दिव्यांगांना घरून मतदान करण्याची सोय दिली आहे. यासाठी त्यांना मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्यामार्फत १२ डी फॉर्म भरून द्यावा लागला. या फॉर्मची तपासणी केल्यानंतर जिल्ह्यातील २ हजार ८६२ मतदार पात्र गृहमतदानासाठी ठरले आहेत. ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांमध्ये धामणगाव रेल्वे मतदारसंघात ३६०, बडनेरा १९२, अमरावती २२१, तिवसा ४८४, दर्यापूर २७३, मेळघाट १५०, अचलपूर ३८८, मोर्शी ३५४ असे एकूण यात २ हजार ४२२ ज्येष्ठ नागरिक मतदार मतदान करणार आहेत.

त्यासोबतच धामणगाव रेल्वे मतदारसंघात ५२, बडनेरा ५३, अमरावती ८२, तिवसा ४७, दर्यापूर ४८, मेळघाट २२, अचलपूर ६७, मोर्शी ६९ असे एकूण यात ४४० दिव्यांग मतदार मतदान करणार आहेत.

गृहमतदानासाठी विधानसभानिहाय चमू तयार करण्यात आली आहे. धामणगाव रेल्वे मतदारसंघात २०, बडनेरा २५, अमरावती १९, तिवसा १५, दर्यापूर १५, मेळघाट १४, अचलपूर १५, मोर्शी १६ अशा १३९ गृहमतदानाची नोंदणी केल्या मतदारांच्या घरी जाऊन पोस्टल बॅलेटद्वारे मतदान करून घेणार आहे.

गृहमतदानाची प्रक्रिया पारदर्शी पद्धतीने करण्यात येणार आहे. मतदारांनी लेखी मागणी केल्यास त्यांना मदतनीसाची मदत घेता येणार आहे. मात्र एका मदतनीसाला केवळ एका मतदाराला मदत करता येणार आहे. गृहमतदानाच्या प्रक्रियेचे निरीक्षक करावयाचे असल्यास राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी यावेळी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले आहे.

प्रितीताई संजय बंड यांच्या मुख्य प्रचार कार्यालयाचे उद्घाटन

विदर्भ प्रजासत्ताक

दि.८अमरावती– ३७ – बडनेरा विधानसभा मतदारसंघ निवडणूक २०२४ च्या अपक्ष उमेदवार प्रितीताई संजय बंड यांच्या मुख्य निवडणूक मुख्य प्रचार कार्यालयाचे उद्घाटन समारंभ बुधवार दि.६ नोव्हेंबर सायंकाळी ५ वाजता पवार मंगल कार्यालय,नेक्सा शो-रूम च्या समोर,बडनेरा रोड अमरावती येथे पार पडला.यावेळी मंचावर माजी आमदार ज्ञानेश्वर धाने पाटील,सामाजिक महीला कार्यकर्त्या अलबिना हक मॅडम,राजेंद्र दारोकार,रऊफ खा साहब,सौ.रक्षणाताई सरदार,सौ.वर्षा यादगीरे,रहेमत खॉ पठाण,माया महाडीक,अलका अंबाडकर,ड.प्रिया भगत,संजय शेटे,सुनील राऊत,सगीरभाई यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सर्व मान्यवरांची भाषणे झाली.यावेळी प्रितीताई संजय बंड म्हणाल्या गेल्या पंधरा वर्षात बडनेरा मतदार संघात कुठलाही विकास न झाल्यामुळे सर्वसामान्यांना अनेक अडचणींनां तोंड द्यावे लागत आहे.बडनेरा मतदार संघातील झोपडपट्टी भागातील नागरिकांच्या समस्या जैसे थे असून कित्येक प्रश्न निघाली न निघाल्यामुळे मतदार संघातील जनता हैराण झाली आहे.जनतेला कुठल्याही सुविधांचा लाभ पोहोचला नाही.मतदारसंघात गेल्या १५ वर्षात उद्योग धंदे न आल्यामुळे युवक बेरोजगारीच्या खाईत लोटला गेला असुन मतदार संघात विकास खुंटला आहे.जनतेपर्यत कुठल्याही प्रकारच्या शासकिय,निमशासकिय सुविधांचा लाभ पोहोचलेला नाही.जर या मतदारसंघाचा चेहरा मोहरा बदलायचा असेल तर मला मतदान रुपी आशीर्वाद देऊन तुमची प्रतिनिधी म्हणुन मला आमदार बनवून विधानसभेत पाठवा असे आवाहन प्रितीताई संजय बंड यांनी यावेळी आपल्या भाषनात केले. यावेळी मतदारसंघातील प्रितीताई संजय बंड यांचा चाहता वर्ग तसेच कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

३७- बडनेरा विधानसभा मतदार
मुख्य प्रचार

प्रचारासाठी 'योगी आदित्यनाथां'ची चक्क जेसीबीतून मिरवणूक?

भाजप उमेदवाराच्या 'आयडिया'ची चर्चा

विदर्भ प्रजासत्ताक

दि.८अकोला : – विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराने वेग धरला आहे. विविध पक्षांतील वरिष्ठ नेत्यांच्या सभांनी मैदान गाजत आहेत. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री तथा प्रखर हिंदुत्ववादी भाजप नेते अशी ओळख असलेले योगी आदित्यनाथ यांची प्रचारसभा मूर्तिजापूर येथे ६ नोव्हेंबरला झाली. या प्रचारसभेमध्ये योगी आदित्यनाथ यांना बघण्यासाठी प्रचंड गर्दी उसळली होती. योगी आदित्यनाथ यांनी हेलिकॉप्टरद्वारे मूर्तिजापूर गाठून सभेमध्ये २० मिनिटांचे भाषण केले. त्यानंतर ते आपल्या पुढील दौऱ्यासाठी रवाना झाले. योगी आदित्यनाथ हेलिकॉप्टरमधून रवाना होत असतांनाच खाली मैदानावर जेसीबीवर योगी आदित्यनाथ यांचा पेहराव केलेल्या भाजप कार्यकर्त्यांसह उमेदवार हरीश पिंपळे यांनी मिरवणूक काढली.

योगींच्या पेहरावातील भाजप कार्यकर्ते अगदी त्यांच्या सारखे वाटत होते. त्यामुळे योगी आदित्यनाथ यांनी जेसीबीतून मिरवणूक काढत प्रचार केल्याची देखील चर्चा रंगली होती. नंतर ते योगी आदित्यनाथ नव्हे तर त्यांच्यासारखा पेहराव करणारे भाजप कार्यकर्ते असल्याचे नागरिकांच्या लक्षात आले. योगी आदित्यनाथ यांच्याप्रमाणे पेहराव करणारे भाजपचे कार्यकर्ते संतोष धुळे हे होते. मूर्तिजापूरमधील तेलीपूरा येथे ते राहतात. भाजपचे ते निष्ठावंत कार्यकर्ते आहेत. हरीश पिंपळे यांच्या प्रचारासाठी योगी आदित्यनाथांसारखा पोषाख परिधान करून ते सभेत आले होते. त्यांना पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी उसळली होती. अनेकांनी त्यांच्यासोबत सेल्फी घेतली. हरीश पिंपळे यांनी प्रचारासाठी त्यांचा वापर करून घेतला. जेसीबीमधून त्यांच्यासोबत हरीश पिंपळे यांनी मिरवणूक काढली. ही मिरवणूक पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती.

विधानसभा निवडणुकीत प्रचाराचा ज्वर चढला. मोठ्या नेत्यांच्या सभांमधून प्रचाराचा धुरळा उडत आहे. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची जेसीबीतून मिरवणूक काढत भाजप उमेदवाराचा प्रचार केल्याची एक चित्रफित सध्या समाजमाध्यमांमध्ये प्रसारित झाली आहे. मात्र, या मिरवणुकीतील योगी आदित्यनाथ हे खरे नसून त्यांचा हुबेहुब पेहराव साकारलेले भाजप कार्यकर्ते आहेत. भाजप उमेदवाराच्या या कल्पनेची चांगलीच चर्चा होत आहे.

एसटीचे वरिष्ठ अधिकारी आणि महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटनेची बैठक

एसटी कर्मचाऱ्यांमध्ये 'दिवाळी भेट'ची आशा पुन्हा पल्लवीत

विदर्भ प्रजासत्ताक

दि.८नागपूर: एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना यंदा दिवाळी भेट आणि अग्रिम रक्कम मिळणार नसल्याचे लोकसत्ताने पुढे आणले होते. त्यावर एसटीचे वरिष्ठ अधिकारी आणि महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटनेची गुरूवारी (७ नोव्हेंबर) बैठक झाली. त्यात महामंडळाने निवडणूक आयोगाने मंजूरी दिल्यास दिवाळी भेट देण्याचे मान्य केले. त्यामुळे पून्हा कर्मचाऱ्यांमध्ये दिवाळी भेटची आशा पल्लवीत झाली आहे.

मुंबईत झालेल्या बैठकीला एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, महामंडळाचे वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी गिरीश देशमुख आणि इतरही काही अधिकारी उपस्थित होते. तर मान्यताप्राप्त संघटनेकडून राज्य अध्यक्ष संदीप शिंदे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

संघटनेकडून बैठकीत दिवाळी भेट व उचलबाबत आक्रमक भुमिका घेतली गेली. संघटना म्हणाली, दिवाळी भेटीची मागणी आचारसंहीतेपुर्वीची असून त्याला बोर्डाच्या बैठकीतही आधीच मंजूरी मिळाली आहे. त्यामुळे या दिवाळी भेट आणि उचलचा आचारसंहितेशी जोडणे चुकीचे आहे.

दरम्यान महामंडळाकडून संघटनेला तांत्रिक अडचणी समजावून सांगण्यात आले. त्यानंतर संघटनेच्या मागणीवरून एसटी महामंडळाने निवडणूक आयोगाला साकडे घालत त्यांनी दिवाळी भेट देण्याला मंजूरी दिल्यास या निधीचे वाटप करण्याचे मान्य केले.

त्यापूर्वी संघटनेकडून यंदाच्या दिवाळीत कर्मचाऱ्यांची आर्थिक कोंडी झाल्याने अनेकांना कर्ज काढावे लागल्याचे सांगितले.

किमान आताही ही आर्थिक मदत मिळाल्यास कर्मचारी कर्जमुक्त होणे शक्य असल्याचेही संघटनेने सांगितले. त्यामुळे महामंडळाकडून लवकरच राज्य निवडणूक आयोगाकडे एसटी कर्मचाऱ्यांना दिवाळी भेटीबाबतचा प्रस्ताव पाठवला जाणार आहे. त्याला आयोगाची मंजूरी मिळाल्यास हा निधी कर्मचाऱ्यांच्या खात्यात वळता केला जाणार आहे. त्यामुळे या प्रकरणात काय होणार? याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. या विषयावर महामंडळाच्या अधिकाऱ्यांशी भ्रमनध्वनीवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता प्रतिसाद मिळाला नाही.

एसटी कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट मिळायलाच हवी. हा कर्मचाऱ्यांचा हक्क आहे. या विषयावर महामंडळ प्रशासासोबत गुरूवारी बैठक झाली. त्यात अधिकाऱ्यांनी भेट देण्याचे मान्य करत त्यासाठी निवडणूक आयोगाला परवानगी मागणार असल्याचे सांगितले. त्यामुळे आयोगाची परवानगी मिळाल्यावर ही भेट मिळणार आहे.

अमित ठाकरेंच्या विरोधात माहिममध्ये सभा घेणार का?

उद्धव ठाकरे म्हणाले, मला आवश्यकता नाही

विदर्भ प्रजासत्ताक

दि.८मुंबई – राज्यात विधानसभेच्या निवडणुकीचा धमाका सध्या सुरु आहे. २० नोव्हेंबर रोजी मतदान आणि २३ नोव्हेंबर रोजी या निवडणुकीचा निकाल लागणार आहे. त्यामुळे २३ नोव्हेंबरच्या दिवसाकडे अनेकांचे लक्ष लागलेलं आहे. खरं तर ही विधानसभेची निवडणूक महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी होणार आहे. सध्या राज्यभरात विविध मतदारसंघात दिग्गज नेत्यांच्या प्रचार सभा सुरु आहेत. या सभांच्या माध्यमातून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु असल्याचंही पाहायला मिळत आहे. मात्र, या निवडणुकीत मुंबईतील माहिम मतदारसंघ चांगलाच चर्चेत आहे. कारण मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे हे पहिल्यांदाच निवडणूक लढवत आहेत.

खरं तर माहिम मतदारसंघात तिंरगी लढत आहे. यामध्ये मनसेचे अमित ठाकरे, शिवसेना (ठाकरे) महेश सावंत आणि शिवसेनेचे (शिंदे) ३) सदा सरवणकर अशी लढत होत आहे. या मतदारसंघात अनेक नाट्यमय घडामोडी देखील घडल्या. सदा सरवणकर हे उमेदवारी मागे घेण्यार असल्याची चर्चा होती. मात्र, शेवटपर्यंत अनेक घडामोडी घडल्या. सदा सरवणकर यांनी उमदेवारी कायम ठेवली. निवडणुकीचा अर्ज मागे घेण्याच्या शेवट्या दिवशी सरवणकर यांचा मुलगा राज ठाकरेंच्या भेटीसाठी शिवतीर्थ दाखल झाले होते. मात्र, यानंतरही त्यांनी उमदेवारी कायम ठेवली.

या सर्व घडामोडी घडल्यानंतर आता विविध मतदारसंघात नेत्यांच्या सभा सुरु आहेत. यातच आज राज ठाकरे यांची वरळीत सभा पार पडली. त्यामुळे आता उद्धव ठाकरे हे माहिम मतदारसंघात सभा घेणार का? याबाबत अनेकांना उत्सुकता लागली होती. आता यासंदर्भात उद्धव ठाकरे यांनी यावर भाष्य करत माहिममध्ये सभा घेणार नसल्याचे स्पष्ट केलं आहे.

■ उद्धव ठाकरे काय म्हणाले?

मला आवश्यकता नाही. माहिम हा माझा आहे. माहिम हा मतदारसंघ शिवसेनेचा (ठाकरे) आहे. आपण तसं पाहिलं तर मुंबईत काल महाविकास आघाडीची एक सभा झाली. यानंतर आता मुंबईच्या बाहेरच माझ्या सभा आहेत. मुंबईकरांवर माझा आणि माझ्यावर मुंबईकरांचा विश्वास आहे, असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं.

नांदेडमध्ये प्रा. लक्ष्मण हाकेंचे वाहन फोडले

विदर्भ प्रजासत्ताक

दि.८नांदेड : ओबीसी आरक्षण आंदोलक प्रा. लक्ष्मण हाके यांच्या वाहनाची काच दगडफेक करून फोडण्यात आली. ही घटना लोहा मतदारसंघातील कंधार तालुक्यातील बाचोटी येथे गुरुवारी रात्री घडली. मराठा तरुणांनी प्रा. हाके यांचे वाहन फोडल्याचा आरोप असून, घटनेनंतर मराठा व ओबीसी असे दोन गट आमनेसामने आल्याने गावात प्रचंड तणाव निर्माण झाला.

प्रा. हाके यांनी ओबीसी कार्यकर्त्यांसह घटनास्थळी ठिय्या मांडला. या वेळी 'एकच पर्व ओबीसी सर्व' अशी जोरदार घोषणाबाजी केली. प्रा. हाके यांनी दगडफेक करणाऱ्यांनी समोर येऊन लढण्याचे आव्हान दिले. सध्या बाचोटी येथे पोलीस बंदोबस्त तैनात आहे.

आदिवासी विद्यार्थ्यांना आता सामाजिक, भावनिक शिक्षण – अभिव्यक्ती प्रकल्प

विदर्भ प्रजासत्ताक

दि.८ अमरावती

आदिवासी विकास विभागाकडून स्लॅम आउट लाऊड (एसओएल) आणि गर्ल रायझिंग या संस्थांच्या सहकार्याने आश्रमशाळांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांमधील सामाजिक-भावनिक शिक्षणाचा स्तर वाढविण्यासाठी अभिव्यक्ती हा नाविन्यपूर्ण प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांना कथाकथन, नाट्य, कविता आणि दृश्य कला या माध्यमातून शैक्षणिक धडे दिले जाणार आहेत.

राज्यात आदिवासी विकास विभागाच्या ४९७ शासकीय आश्रमशाळा असून, त्यामध्ये सुमारे दोन लाख विद्यार्थी प्रवेशित आहेत. या विद्यार्थ्यांच्या सामाजिक-भावनिक शिक्षणावर लक्ष केंद्रित करण्यासाठी आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे आणि आयुक्त नयना गुंडे यांच्या पुढाकाराने अभिव्यक्ती प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. त्यासाठी कलेवर आधारित अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या पहिल्या वर्षी १० हजार विद्यार्थी, २०० शिक्षक आणि ४० एसईएल चॅम्पियन्सपर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. दरम्यान, अभिव्यक्तीद्वारे आदिवासी विद्यार्थ्यांना सामाजिक-भावनिक शिक्षणाच्या तत्वांबरोबरच हवामान बदल तसेच किशोरवयीन मुलांमधील भावनिक जागरूकता आणि विश्लेषणात्मक विचार यासारख्या महत्त्वपूर्ण कौशल्यांसह सक्षम बनविले जाणार आहे. लैंगिक समानतेची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात येत आहे.

■ अभिव्यक्ती प्रकल्प हा आश्रमशाळांमधील सामाजिक-भावनिक शिक्षणात परिवर्तन करण्याच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल असणार आहे. हवामान बदल, लैंगिक समानता यासारख्या गंभीर मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. हा प्रकल्प शालेय शिक्षण क्षेत्रातील सकारात्मक बदलांसाठी दिशादर्शक ठरणार आहे.

नयना गुंडे (आयुक्त, आदिवासी विकास विभाग)

■ शिक्षकांना दोन दिवसीय प्रशिक्षण

नाशिक अपर आयुक्तालयातील शिक्षकांना अभिव्यक्ती प्रकल्पाअंतर्गत दोन दिवसीय प्रशिक्षण देण्यात आले. नागपूर, ठाणे आणि अमरावती विभागांमध्येही प्रशिक्षण दिले जाणार आहे. दरम्यान, अभिव्यक्ती'मध्ये शिक्षकांना सामावून घेण्यात आले असून, त्यांना प्रशिक्षित केले जात असल्याचे स्लॅम आऊट लाऊडच्या नेहा राठी यांनी सांगितले. सामाजिक-भावनिक शिक्षणामुळे आदिवासी समुदायामध्ये कायमस्वरूपी सकारात्मक बदल होईल, अशी अपेक्षा गर्ल रायझिंगच्या रिचा हिंगोरानी यांनी व्यक्त केली.

तब्बल १ कोटी ११ लाखांचे सोन्याचे चेंडू घेऊन फिरत होता

पोलिसांनी हटकलं अन् धक्कादायक प्रकार आला समोर!

विदर्भ प्रजासत्ताक

दि.८मुंबई– मुंबई : सध्या राज्यात निवडणुकीचं वातावरण आहे. आचारसंहिता लागू असल्यामुळे अनेक कामं ही नियमांना लक्षात घेऊनच करावे लागत आहेत. असे असले तरी महाराष्ट्रात आतापर्यंत अनेक ठिकाणी पोलिसांनी कोट्यवधीची रक्कम जप्त केली आहे. असे असतानाच आता मुंबईतील वडाळ्यातून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. येथे एका इलेक्ट्रिशियनकडे तब्बल १ कोटी ११ लाख रुपये किमतीचे सोन्याचे चेंडू सापडले आहेत. पोलिसांकडून याबाबत तपास केला जातोय.

मिळालेल्या माहितीनुसार गुरुवारी (७ नोव्हेंबर) रात्री एका इलेक्ट्रिशियनकडून तब्बल १ कोटी ११ लाख किमतीचे सोन्याचे पावडर असलेले चेंडू जप्त करण्यात आले. हा इलेक्ट्रिशियन मूळचा चेन्नईचा असल्याचे समोर आले असून त्याचे नाव अब्दुलकर अब्दुल मजीद असे आहे. त्याने डोंगरी येथे राहणाऱ्या शकील नावाच्या एका व्यक्तीकडून हे सोन्याचे चेंडू घेतले होते. हे चेंडू मजीद याला अंधेरीतील एका व्यक्तीकडे सोपवायचे होते. मात्र ही डील होण्याआधीच पोलिसांनी या इलेक्ट्रिशीयनला अटक केली. या प्रकरणाचा संपूर्ण तपास वडाळा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजीव शेजवळ यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार गुरुवारी रात्री दहा वाजेच्या सुमारास वडाळा परिसरात अब्दुल मजीद याच्या काही संशयास्पद हालचाली दिसू लागल्या. पोलिसांनी त्याला हेरलं. त्यानंतर त्याची चौकशी केली. झडती करत असताना पोलिसांना त्याच्याकडे १ कोटी ११ लाख रुपयांचे एकूण १४५७.२४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे चेंडू सापडले. हा प्रकार समोर आल्यानंतर पोलिसांनी त्याची चौकशी केली. त्याच्याजवळ असलेल्या सोन्याचे बील त्याला विचारण्यात आले. मात्र आरोपी अब्दुल मजीद त्याच्याजवळ असलेल्या कोणत्याही सोन्याचे बील देऊ शकला नाही. त्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. जप्त करण्यात आलेले सर्व चेंडू हे प्लास्टिक टेपने गुंडाळलेले होते. आरोपी अब्दुल याची पोलिसांनी चौकशी केली आहे. आरोपीने दिलेल्या माहितीनुसार हे सोने शकील नावाच्या व्यक्तीचे आहे. तो चेन्नई येथून डोंगरीतील दर्गा या भागात होता. तो याच भागातील एका हॉटेलमध्ये थांबला. त्यानंतर अब्दुल याच्या चुलत भावाने हे चेंडू शकीलकडून घेऊन अंधेरीतील एका व्यक्तीकडे सोपवण्याची जबाबदारी दिली. मात्र ही डील पूर्ण होण्याआधीच बिंग फुटले आणि पोलिसांनी आरोपीला अटक केली.

राजकीय वादांचे बॉम्ब, निवडणुकीच्या प्रचारात आरोप-प्रत्यारोपांचे फटाके

नवनवीन मुद्दे आणि वादग्रस्त वक्तव्यांची मालिका

विदर्भ प्रजासत्ताक

दि.८नागपूर – दिवाळीच्या फटाक्यांचे आवाज विरल्यानंतर आता विधानसभा निवडणुकीच्या प्रचारातील फटाक्यांचे आवाज कानी येत आहेत. प्रचाराला वेग येत आहे. नवनव्या वादांचे बॉम्ब फुटत आहेत. विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी यांनी नागपुरातील सभेत लाल रंगाचे कव्हर असलेल्या संविधानाची प्रत हाती घेऊन भाषण केले. त्यावरून भाजप नेत्यांनी निशाना साधला. त्यावर गुरुवारीही पडसाद उमटले. नेत्यांकडून वादग्रस्त वक्तव्यांची मालिका सुरूच असून, त्याचेही पडसाद उमटत आहेत. यादरम्यान महाविकास आघाडीच्या नेत्यांनी विदर्भात प्रचार सभांमधून राजकीय हल्ले सुरूच ठेवले आहेत.

नागपुरात उद्योग यावेत, येथील बेरोजगार युवकांना रोजगार मिळावा, यासाठी प्रयत्न होणे अपेक्षित आहे. परंतु, नागपूर येथे होणारा सी–२९५ लष्करी ट्रान्सपोर्ट एअरबस हा प्रकल्प गुजरातला कुणी पळवला. पंतप्रधान एका राज्याच्या हिताची भूमिका घेत आहेत, त्यांना त्या पदावर बसण्याचा अधिकार आहे का? असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांनी गुरुवारी येथे केला.

भाजपचा अजेंडा 'बटेंगे तो कटेंगे' नव्हे तर 'हम महाराष्ट्र को लुटेंगे और हमारे दोस्तों को बाटेंगे', असा आहे. जनभावना या सरकारविरोधात आहे. मविआ सरकार आल्यानंतर पाच वस्तूंच्या किमती स्थिर ठेवू, अशी ग्वाही माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी अमरावती येथे दिली.

■ सुनील राऊत यांची जीभ घसरली

संजय राऊत यांचे बंधू आमदार सुनील राऊत यांनी त्यांच्या विरोधातील शिंदेसेनेच्या सुवर्णा करंजे यांच्याबद्दल वादग्रस्त विधान केले. त्यावर त्यांची उमेदवारीच रद्द करण्याची मागणी विरोधकांनी केली. 'माझ्यासमोर लढवण्यास कोणी टिकू शकत नाही. तूल्यबळ उमेदवार मिळत नव्हता म्हणून आता कोणाला तरी बकरा बनवलाय. माझ्या गळ्यात बकरी मारलेय. आता २० तारखेला बकरीला कापू', असे विधान राऊत यांनी केले.–

मतदारांच्या हस्ते चांदूरबाजार येथील प्रचार कार्यालयाचे उद्धघाटन

महाराष्ट्राच्या सेवेसाठी एक मत द्या–बच्चू कडू यांनी मतदारांना घातली साद

विदर्भ प्रजासत्ताक
दि.८चांदूर बाजार

अचलपूर व चांदूर बाजार ही संतांची भूमी असून सेवा हेच कर्म आहे. या सेवेचा अधिक आनंद घेण्यासाठी आणि महाराष्ट्राची सेवा करण्यासाठी आपले केवळ एक मत द्या अशी साद बच्चू कडू यांनी मतदार संघातील मतदारांना घातली. शेतकरी, शेतमजूर ,दिव्यांग, कामगार व कष्टकरी घटकांचे लढवय्ये योद्धा म्हणून सर्वत्र परिचीत असलेले परिवर्तन महाशक्ती चे उमेदवार प्रहारचे संस्थापकअध्यक्ष बच्चू कडू यांच्या चांदूर बाजार स्थित आनंद सभागृह येथील प्रचार कार्यालया चे उपस्थित मतदारांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. या उद्धघाटन प्रसंगी बच्चू कडू बोलत होते.आपण सर्वजण सेवेचा झेंडा घेऊन निवडणुकीला सामोरे जात असून हा सेवेचा घोडा येथे थांबायला नको असे सांगून रुग्णांच्या सेवेसाठी संपूर्ण राज्यात रुग्णसेवकांची फौज निर्माण करणार असल्याचे बच्चू कडू म्हणाले. बदल व परिवर्तनासाठी सर्व मतदारांनी परिवर्तन महाशक्ती आघाडी व प्रहारच्या मागे उभे राहून आपली खंबीर ताकद पाठीशी उभी करावी असे आवाहन देखील यावेळी बच्चू कडू यांनी केले.

बच्चू कडू यांच्या चांदुर बाजार येथील प्रचार कार्यालयाचे थाटात उदघाटन झाले.बच्चू कडू यांनी सलग चार वेळा या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले. जनसेवेचा वसा जोपासणाऱ्या बच्चू कडू यांच्या प्रचार कार्यालयाचे उदघाटन सामान्य मतदारांच्या हस्ते करून खऱ्या अर्थाने मतदारांची ताकद काय असते हे या निमित्ताने बच्चू कडू यांनी दाखवून दिले. बच्चू कडू हे जनसामान्यांचे नेते आहेच शिवाय युवा वर्गाचे आयकॉन देखील ते आहेत.

बारी समाजाचे नेते अशोक वसुले ,जयकुमार चर्जन, जयंतराव गवई ,गौतम गुडदे,जितू दुधाने, राजेंद्र भुगुल, रहमान भाई ,राजेंद्र याऊल शैलेश निरगुडे ,हेमंत तडस, मंगेश देशमुख, संतोष किटुकले ,राजेंद्र गायकी घोडे काका ,लतीफ खान ,बंडू कुयटे ,घनश्याम पेठे दिवाकर तायवाडे,दिनेश अंधारे ,बाळासाहेब वाकोडे, रमेश पळसपगार, मोहन खंडारे , अबूदादा वानखडे यांच्या उपस्थितीत झालेल्या प्रचार कार्यालय उद्धघाटन सोहळ्यास बेबी चव्हाण, माधुरी सोळंके, सुशीला पाटणकर, सिंधू गवई, बिरजूला मोहोळ ,राजकन्या आठवले, पूजा तायडे, रुखमा राऊत, रेखा कांबळे, आशा इंगळे ,मंजू तंतरपाळे, बहिणाबाई रंगोली, अरुणा मनोहरे, शारदा इंगळे या मातृशक्तीसह अभिजीत हिरेमठ, जय नाईक, अभिषेक निरगुडे, सम्यक शिरसाट, अभिजीत शिरसाट ,आनंद तायडे, रोशन तायडे, रवी इंगळे, अभय तायडे ,प्रवीण मोहोळ, अनुराग मनोहरे, प्रफुल्ल मोहोळ, अभिषेक राठोड, रोहित जवंजाळ व प्रहार पदाधिकारी व असंख्य प्रहार कार्यकर्ते उपस्थित होते.

आपल्या ताकदीमुळे भाजपने दिला डमी उमेदवार

गेल्या चार निवडणुकीत आपण सर्व मतदारांनी जी मोठी ताकद माझ्यामागे उभी केली ती ताकद व शक्ती लक्षात घेता अडचणीत सापडलेल्या भाजपने यावेळी डमी उमेदवार दिल्याचा दावा बच्चू कडू यांनी याप्रसंगी बोलतांना केला .समोर पंजा दिसत असला तरी मागून त्याला कमळ धक्का देत असल्याचे सांगून यावेळी त्यांचे डिपॉझिट जप्त होईल असा आत्मविश्वास देखील बच्चू कडू यांनी व्यक्त केला.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला खिंडार

निवडणुकीच्या काळात अचलपुर मतदार संघातील काँग्रेस, भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या कारकर्ते व पदाधिकाऱ्यांनी पक्षाला रामराम करत प्रहार जनशक्ती पक्षात प्रवेश करून बच्चू कडू यांचे हात बळकट केले आहे. दररोज शेकडो कार्यकर्ते प्रहार मध्ये दाखल होत असून काल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अचलपूर तालुकाध्यक्ष गजानन तट्टे यांनी सुद्धा शेकडो कार्यकर्त्यांसह प्रहारमध्ये प्रवेश केला असून यामुळे अचलपूर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला खिंडार पडली असल्याचे चित्र आहे.

बॅटने मतांचा डोंगर उभा करणार

प्रचार कार्यालय उद्घाटन प्रसंगी उपस्थित मातृ शक्तीने बच्चू कडू यांचे औक्षण करून त्यांना विजयाचा आशीर्वाद दिला. बच्चू कडू यांनी गेल्या वीस वर्षात महिलांकरिता मोठे कार्य केले असून अनेक महिलांना विविध योजनांचा लाभ मिळवून देत न्याय दिला. तळागाळातील प्रत्येकाला सांभाळून घेत न्याय मिळवून देणाऱ्या बच्चू कडू यांच्यासारख्या लोकप्रतिनिधीची आणखी काही वर्ष गरज असल्याच्या भावना मातृशक्तीने व्यक्त करीत बच्चू कडू यांची बॅट घराघरात पोहोचून विधानसभा निवडणुकीत बॅटने मोठी फटकेबाजी करीत धावांच्या रूपाने मतांचा डोंगर उभा करणार असा निर्धार उपस्थित महिलांनी केला.

महाराष्ट्रद्रोह्यांना त्यांची जागा दाखवा

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे आवाहन बडनेरा येथे सुनील खराटेंच्या प्रचारार्थ जाहीर सभा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.८अमरावती

निवडणुकीच्या तोंडावर हिंदु–मुस्लीम व इतर समाजात तेढ निर्माण करून तोडा आणि फोडा नितीने भाजपचे सरकार सत्तेत बसण्याची स्वप्ने बघत आहे. राज्यातील सगळे उद्योग गुजरातला नेले जात असून मुंबईसह महाराष्ट्र त्यांना लुटून न्यायचा आहे. मात्र, हे राज्य स्वाभिमानी असून ते कधीही तुटु आणि लूटू देणार नाही. मी मुख्यमंत्री असताना त्यांना महाराष्ट्राकडे वाकड्या नजरेने पाहू दिले नाही. माझ्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात एकही उद्योग राज्याबाहेर जाऊ दिला नाही. हेच खुपल्याने भाजपने माझे सरकार पाडले.आता चेल्याचपाट्यांना बसवून ते महाराष्ट्र लुटत आहेत. अशा महाराष्ट्रद्रोह्यांना जागा दाखवण्याची वेळ आली आहे असा घणाघात शिवसेना पक्षप्रमुख व राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सत्ताधारी महायुतीवर टीकेची झोड उठविली. बडनेरा विधानसभा मतदार संघाचे महाविकास आघाडी व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अधिकृत उमेदवार सुनील खराटे यांच्या प्रचारार्थ बडनेरा नवी वस्ती येथील आठवडी बाजार प्रांगणात जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. या जाहीर सभेला उद्धव ठाकरे संबोधित करत होते.या जाहीर महासभेच्या मंचावर शिवसेना नेते खा. अरविंद सावंत, बडनेरा विधानसभा मतदार संघाचे उमेदवार सुनील खराटे, अमरावती विधानसभा मतदार संघाचे उमेदवार डॉ.सुनील देशमुख,खा. बळवंत वानखडे,माजी खा. अनंत गुढे, रिपाई चे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. राजेंद्र गवई, राष्ट्रवादीचे शहर अध्यक्ष डॉ. हेमंत देशमुख, माजी महापौर विलास इंगोले, काँग्रेस शहराध्यक्ष बबलू शेखावत माजी आ. प्रदीप वडनेरे,शिवसेनेचे जिल्हा संपर्क प्रमुख सुधीर सूर्यवंशी,महानगर प्रमुख पराग गुढधे, आसावरी देशमुख, भीमशक्तीचे पंकज मेश्राम, डॉ.तायडे,प्रशांत वानखडे, दिगंबर मानकर, रामा सोळंके,विनेश आडतीया आदी मान्यवर उपस्थित होते. ज्याच्या हातात मशाल तोच आपला खरा उमेदवार असून सुनील खराटे सारख्या सामान्य कार्यकर्त्याला तुमच्या आशीर्वादाची गरज असून तुम्ही मतदानरुपी आशीर्वाद देऊन बहुमताने विजयी कराल असा विश्वास देखील उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला. सध्या मुलींना मोफत शिक्षण दिले जात असले तरी मुलांनी काय घोडे मारले आहे. त्यांनाही अशा शिक्षणाची नितांत गरज असून महाविकास आघाडी सत्तेत आल्यास मुलांना सर्व प्रकारचे मोफत शिक्षण देणार असल्याची घोषणा शिवसेना पक्षप्रमुख, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली.माझे सरकार पाडले नसते तर मी पुन्हा शेतकऱ्यांची कर्जमाफी केली असती.तुम्ही आशीर्वाद दिले म्हणून मी शेतकऱ्यांची कर्जमुक्ती केली. ते तुमचे पैसे होते मी फक्त कर्तव्य केल्याचे सांगून महाविकास आघाडीचे सरकार आल्यास पुन्हा तीन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी करून शेतकऱ्यांना बळ देण्यात येईल अशी ग्वाही देखील उद्धव ठाकरे यांनी उपस्थित जनसमुदायाला दिली. शिंदेंना वाटले तर चिन्ह द्या, पण शिवसेना माझीच राहणार.आई वडिलांनी दिलेले नाव निवडणूक आयोग कसे काय दुसऱ्याला देऊ शकतो. शिवसेना हे नाव माझे आहे. मी शिवसेनाच वापरणार. वाटले तर चिन्ह द्या, तो अधिकार तुमचा आहे. पण नाव माझे आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाचा उरफाटा निर्णय मी मान्य करणार नाही, असे उद्धव ठाकरे यांनी ठणकावले.या जाहीरसभेला प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता. याप्रसंगी व्यासपीठावरील उपस्थित महाविकास आघाडीच्या सर्व नेत्यांनी उद्धव ठाकरे यांचा जाहीर सत्कार केला. यावेळी उपस्थित जनशक्तीने उद्धव साहेब तुम आगे बढोच्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला होता.

गाडगेबाबांच्या दशसुत्रीला अनुसरून शिवसेनेचा वचननामा

संत गाडगेबाबांनी दशसुत्री दिली असून एक कुटुंबप्रमुख म्हणून त्यांच्या दशसूत्रीवर आधारित वचननामा तयार केलेला आहे. गाडगेबाबांनी जे संस्कार व विचार दिले त्या संस्कार व विचारला जपण्याचे काम शिवसेनेने केले असल्याचे सांगून काही मिंध्ये हे गाडगेबाबांचे संस्कार व विचार पुसून टाकण्याचा प्रयत्न करत असल्याचा हल्लाबोल देखील उद्धव ठाकरे यांनी यावेळी केला.

प्रत्येक जिल्ह्यात शिवाजी महाराज यांचे मंदिर उभारणार

भाजप सरकारच्या काळात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यात भ्रष्टाचार केला. मंत्री, राज्यपालांनी महाराजांचा वारंवार अपमान केला. महाराजांचा अवमान जनता विसरलेली नाही. महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर प्रत्येक जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज यांचे मंदिर उभारणार असल्याची घोषणा करत ठाकरे यांनी याच मंदिरात महाराजांचा अवमान करणाऱ्यांना नाक घासायला लावणार असल्याचा इशारा दिला. गद्दारांना ज्या सुरतमध्ये ठेवले होते त्या सुरतमध्येही महाराजांचे मंदिर उभे करणार, भाजपच्या नेत्यांनी मला अडवून दाखवावे, असे आव्हानही ठाकरे यांनी दिले.जीवनावश्यक वस्तूंचे भाव स्थिर ठेवू लाडकी बहीण योजनेच्या पैशामुळे राज्यातील एका तरी कुटुंबांचे समाधान झाले आहे का, असा सवाल ठाकरे यांनी विचारला. महागाईमुळे जनता त्रस्तू असून महाविकास आघाडी सरकार सत्तेत आल्यास जीवनावश्यक वस्तूंचे भाव स्थिर ठेवणार असल्याचा शब्द त्यांनी दिला.

प्रत्यक्ष कृति करून दाखविणार – सुनील खराटे

जाहीर सभेत बडनेरा विधानसभा मतदार संघातील उमेदवार सुनील खराटे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मी बोलणार नाही तर प्रत्यक्ष कृति करून दाखवणार अशी हमी देत मी खेळाडू आहे, खेळाडू नेहमीच जिद्दीने खेळतो आणि जिंकण्यासाठीच खेळतो या निवडणुकीच्या खेळात सुद्धा आपल्या सर्वांच्या आशिर्वादाने जिंकणार असा मला विश्वास असून माझ्या मशाल चिन्हासमोरील बटन दाबून मला प्रचंड बहुमताने विजयी करा असे आवाहन सुनील खराटे यांनी जाहीर सभेत केले. विद्यमान आमदाराच्या कारभारावर ताशेरे ओढून पंधरा वर्षांपासून या मतदार संघाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आमदाराने मतदारसंघाचा विकास न करता केवळ स्वतःचा,कुटुंबांचा व नातेवाईकांचा विकास करून परिसर भकास केला असल्याचा आरोप यावेळी सुनील खराटे यांनी केला.

महायुतीच्या उमेदवार सौ.सुलभाताई खोडके यांची नवसारी, सिद्धार्थ नगर, साळवे कॉलोनी, भीम नगर येथे आशीर्वाद पदयात्रा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.८अमरावती ७

लोककल्याणकारी योजना केंद्राची असो,वा राज्याची;ती अधिकाधिक प्रभावी पद्धतीने राबवून जनतेची सोय करणे महत्वाचे आहे.आपल्याकडील सर्वसाधारण शाळांमध्येही मुलांचा बौद्धिक, शारीरिक, मानसिक आणि नैतिक विकास घडविण्यासाठी त्यांना दर्जेदार शिक्षणाचा लाभ झाला पाहिजे यावर आपला सातत्यपूर्ण भर आहे.मुलांच्या कार्यात्मक,सामाजिक,मानसिक विकासासाठी आखलेल्या आणि शिक्षकांना तो पद्धतशीरपणे आजमावण्याची संधी देणाऱ्या कृती शाळेत घडल्या पाहिजेत,त्यांचे यथायोग्य मूल्यमापन झाले पाहिजे जेणेकरून विद्यार्थी, पालक व शिक्षकांचे हीत जोपासण्यासह संघभावना आणि नैतिकता दोन्ही गोष्टी विकसित होऊन विद्यार्थ्यांच्या क्षमता विकासासाठी आपण कटिबद्ध आहोत.असे प्रतिपादन महायुतीच्या उमेदवार–सौ.सुलभाताई संजय खोडके यांनी नवसारी येथे आशिर्वाद पदयात्रेत उपस्थितांना संबोधून केले.प्रगत तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे कारखान्यातील उत्पादन प्रक्रियांमध्ये संख्यात्मक व गुणात्मक बदल होत आहेत. संगणक व इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रामध्ये विकासाची गती अधिक असल्याने या क्षेत्रातील कामगार,कारागीर व तंत्रज्ञ यांना नवीन प्रकारचे प्रगत–कौशल्य व ज्ञान देऊन त्यांना तांत्रिकदृष्ट्या कार्यक्षम करण्याकरिता हायटेक प्रशिक्षण योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत.राज्यात मध्यम व मोठ्या औद्योगिक आस्थापनांची तसेच लघुउद्योगांची वाढ झाल्यामुळे कुशल कामगारांची गरज निर्माण झालेली आहे, त्याचबरोबर स्वयंरोजगाराच्या संधीसुद्धा उपलब्ध झालेल्या आहेत, त्याकरिता विविध क्षेत्रात कुशल मनुष्यबळ उपलब्ध व्हावे.तसेच आधुनिक तंत्रज्ञानानुसार झालेले बदल,औद्योगिक व सेवा क्षेत्रामध्ये असलेली मनुष्यबळाची मागणी पूर्ण होण्याला घेऊन व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय अंतर्गत असलेल्या विविध योजनांचा विद्यार्थ्यांना लाभ झाला पाहिजे.याला आपले सर्वतोपरी प्राधान्य आहे.आशीर्वाद पदयात्रेत वाटचाल सुरू असताना महायुतीच्या उमेदवार–सौ.सुलभाताई खोडके यांनी यावेळी नवमतदारांशी संवाद साधताना असा विश्वास सिद्धार्थ नगर येथे स्थानिकांसमक्ष व्यक्त केला.तदपूर्वी आमदार–सौ.सुलभाताई खोडके यांनी तथागत भगवान गौतम बुद्ध, भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर, स्त्री शिक्षणाचे प्रणेते–महात्मा जोतिबा फुले,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून विनम्रपणे अभिवादन केले.

कांदा ८०, लसूण ५०० रुपये किलो

निवडणुकीच्या तोंडावर दरवाढ सर्वपक्षीय उमेदवारांना टेन्शन

विदर्भ प्रजासत्ताक
दि.८ अमरावती

निवडणुकीचे वातावरण तापू लागले असताना दुसरीकडे महागाईही वाढू लागली आहे. किरकोळ मार्केटमध्ये कांदा ८० रुपये किलो व लसूण ५०० रुपये दराने विकला जात आहे. निवडणुकीच्या काळात भाववाढ सुरू असल्याने नागरिकांच्या नाराजीच्या रोषामुळे सर्वपक्षीय उमेदवारांचे टेन्शन वाढले आहे.

परतीच्या पावसाचा फटका कांदा उत्पादनावर झाला असून आवक कमी होऊ लागली आहे. अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये एक आठवड्यापूर्वी बाजार समितीत कांदा १८ ते ४८ रुपये किलो दराने विकला जात होता. आता हेच दर ३५ ते ६२ वर पोहचले आहेत. किरकोळ मार्केटमध्ये कांदा ७५ ते ८० रुपये किलो दराने विकला जात आहे. अजून दोन आठवडे कांदा दर तेजीत राहतील, असा अंदाज व्यापाऱ्यांनी व्यक्त केला आहे. एक वर्षापासून लसूणचे दर तेजीत आहेत. बुधवारी बाजार समितीमध्ये लसूण २२० ते ३२० रुपये किलो दराने विकला गेला. किरकोळ मार्केटमध्ये लसूण ५०० रुपये किलो दराने विकला जात आहे. नवीन वर्षात नवीन पीक बाजारात येईपर्यंत लसूणची भाववाढ सुरूच राहण्याची शक्यता आहे.

वाटाणाही २५० पार...

हिरव्या वाटाण्याचाही मार्केटमध्ये तुटवडा निर्माण झाला आहे. बाजार समितीमध्ये वाटाणा १६० ते २०० रूपये किलो दराने विकला जात आहे.

किरकोळ मार्केट मध्ये हेच दर २५० रूपये किलोपर्यंत पोहचले आहेत. किरकोळ मार्केट मध्ये मेथीची जुडीही ३० रूपये किलो दराने विकली जात आहे.

शेवगा शेंगाचे दर किरकोळ मार्केटमध्ये १३० रूपयांवर पोहचले असून वालाच्या शेंगा १२० रूपयांवर पोहचल्या आहेत.

विदर्भ प्रजासत्ताक
कुरुक्षेत्र महाराष्ट्र
https://epaper.vidarbhaprajasattak.com
अमरावती
शुक्रवार दि. ८ नोव्हेंबर २०२४

यशोमती ठाकूर यांच्या प्रचारार्थ खा.मल्लिकार्जुन खरगे यांची उद्याला जाहीर सभा

गुरुकुंज मोझरी येथे होणार विरोधकांचे वस्त्रहरण

विदर्भ प्रजासत्ताक
दि.८अमरावती

तिवसा विधानसभा मतदारसंघासाठी महाविकास आघाडी कडून निवडणूक लढवीत असलेल्या लोकनेत्या यशोमती ठाकूर यांच्या प्रचारार्थ अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते खासदार मल्लिकार्जुन खरगे अमरावती जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. शनिवार ९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता गुरुकुंज मोझरी येथे आयोजित जाहीर सभेमध्ये ते विरोधकांचे वस्त्रहरण करतील.निवडणुकीतील प्रचाराला आता चांगलाच वेग आला असून जिल्ह्यात दिग्गज नेत्यां च्या विविध ठिकाणी सभा आयोजित करण्यात आले आहेत. लोकनेत्या यशोमती ठाकूर यांच्या प्रचारार्थ काँग्रेसचे नेते मल्लिकार्जुन खरगे हे देखील मैदानात उतरले असून त्यांचे विचार ऐकण्यासाठी हजारो नागरिकांची गर्दी गुरुकुंज मोझरी येथे होणार आहे. मल्लिकार्जुन खरगे यांनी आपल्या ओजस्वी वाणीने केंद्र सरकारला धारेवर धरले आहे. चुकीचे अनेक प्रकरण उजेडात आणून खर्गे यांनी राष्ट्रहितासाठी कार्य केले आहे.

केंद्रातील प्रभावी नेतृत्व तिवसा मतदार संघात नागरिकांना संबोधित करायला येत असल्याने त्यांचे विचार ऐकण्यासाठी लोकांची तोबा गर्दी राहणार आहे. यशोमती ठाकूर यांचा देखील कणखर व प्रभावी नेतृत्व म्हणून राज्यात नावलौकिक आहे. यशोमती ठाकूर यांनी केलेला विकास सर्वश्रुत असून त्या विजयाचा चौकार लगावतील असा आशावाद तिवसा मतदार संघातील नागरिकांना आहे. यशोमती ठाकूर यांना मतदारांचा मिळत असलेला उत्स्फूर्त प्रतिसाद लक्षात घेता त्यांच्या विजयामध्ये खर्गे यांची सभा महत्त्वाची ठरेल अशी चर्चा मतदारांनी व्यक्त केली आहे.

मतदान करून लोकशाहीला बळकट करा, शंकरबाबा पापळकर यांचे सर्व दिव्यांग मतदारांना आवाहन

विदर्भ प्रजासत्ताक
दि.८परतवाडा २

विधानसभा निवडणुकीत सर्व दिव्यांगांनी कर्तव्यभावना म्हणून व लोकशाहीला बळकट करण्यासाठी मतदान करण्याचे आवाहन पद्मश्री शंकरबाबा पापळकर यांनी बुधवारी केले. सहायक नोडल अधिकारी पंकज जी. मुद्गल व नीरज तिवारी यांनी शंकरबाबांची वझर येथे भेट घेत सर्व मतदारांना मतदानाकरिता प्रेरित करण्याकरिता मार्गदर्शन व आवाहन करण्याची विनंती केली होती.

ते माझे कर्तव्य आहे, मी नक्कीच दिव्यांगांना मतदानाकरिता प्रेरित करेन व लोकशाही बळकट करण्याकरिता आपले शक्य तेवढे योगदान देईल, असे विचार मांडले. जिल्ह्यातीलच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व दिव्यांगांनी अवश्य मतदान करावे, असे आवाहन सर्व मतदारांना व दिव्यांगांना केले. त्याचबरोबर पीडब्ल्यूडी अंतर्गत जिल्ह्यात होत असलेल्या कार्याचे बाबांनी कौतुक केले.

आयोगाच्या दिशानिर्देशानुसार दिव्यांग मतदारांचा मतदानाचा टक्का वाढावा, यासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी पीडब्ल्यूडी स्वतंत्र नोडल अधिकारी म्हणून जया राऊत, सहायक नोडल अधिकारी राजेंद्र जाधवर, डी. एम. पुंड, पी. डी. शिंदे, पवन साबळे, भारत राऊत, शालिनी गायबोले, उमेश धुमाळे, आशिष चुनळे, पंकज मुदगल व नीरज तिवारी यांची नियुक्ती केली आहे.

दिव्यांग मतदारांसाठी कार्यशाळा उपयुक्त

ईव्हीएम प्रात्यक्षिक कार्यशाळा अतिशय फायदेशीर आहेत. यामुळे दिव्यांग मतदाराला ईव्हीएम मशीनवर आपले मत कसे नोंदवायचे हे कळते व तो स्वतंत्रपणे मतदान करू शकतो, ज्यामुळे मतदानाची गोपनीयता राखता येते, असे मत बाबांनी व्यक्त केले. याबाबत होणाऱ्या कार्यशाळेस सर्व दिव्यांगांनी उपस्थित राहावे, असे आवाहन शंकरबाबांनी केले आहे.

गांधारी म्हणाली, मी करणार मतदान

या भेटीवेळी शंकरबाबांची मानसकन्या गांधारीसुद्धा उपस्थित होती. तिनेसुद्धा जिल्ह्यातील मतदारांना मतदान करण्याबाबत आवाहन केले. ती म्हणाली, ‘मी दिव्यांग असून येत्या २० नोव्हेंबरला मतदान करणार आहे, आपणही जरूर मतदान करावे व लोकशाहीला बळकट करावे.’ असे आवाहन केले.

मुस्लिम बहुल भागात मतदान जनजागृती रॅलीचे आयोजन

जिल्हाधिकारी सौरभ कटीयार यांनी हिरवी झेंडी दाखवुन सुरुवात

विदर्भ प्रजासत्ताक
दि.८अमरावती

आज पोलिस आयुक्तालय शहर अमरावती व मनपा व जिल्हा स्वीप कक्ष आणि शिक्षण विभाग मनपा,नागपूरीगेट पोलिस स्टेशनच्या वतीने मतदान जनजागृतीचा कार्यक्रम घेण्यात आला.यावेळी मतदारांना मतदार स्लिपचे वाटप,मतदानाची शपथ आणि बाईक रॉलीचे आयोजन करण्यात आले होते.* या कार्यक्रमाला जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी सौरभ कटीयार,पोलीस आयुक्त शहर नविनचंद्र रेड्डी,स्वीप नोडल अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापाञ,महानगर आयुक्त सचिन कलंञे,डीसीपी सागर पाटील,शुभांगी बारस्कर,शिवाजी शिंदे, प्रोपसनल अमर राऊत,आरो अनिल भटकर,मनपा उपायुक्त मेघना वासनकर,शिल्पा नाईक ,माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रिया देशमुख, प्राथमिक शिक्षणाधिकारी बुध्दभूषण सोनोने,मनपा स्वीप नोडल अधिकारी प्रकाश मेश्राम,जिल्हा स्वीप कक्षाचे ज्ञानेश्वर घाटे,संजय राठी, मनपा शाळा निरीक्षक योगेश पखाले ,राजेश सावरकर,हेमंत कुमार यावले,श्रीकांत मेश्राम ,प्रवीण ठाकरे , सोमेश वानखडे, उज्वल जाधव ,प्रवीण ठाकरे ,संजय बेलसरे,पंकज सपकाळ ,योगेश राणे,प्रवीण माहुलकर,पंकज सपकाळ,आदित्य मेश्राम सह अधिकारी,कर्मचारी,शिक्षक, शिक्षिका,बीएलओ,आशा वर्कर,वाहतुक पोलिस,दामिनी पथक उपस्थित होते.मान्यवरांनी उपस्थितांना मार्गदर्शन करत येत्या २०नोव्हेंबरला होणार्या विधानसभा निवडणूकीत १००%नागरीकांनी मतदान करावे.मतदारांना आपले मतदान केंद्र शोधन्या करीता जिल्हा प्रशासन हेल्पलाईन नंबर सुरु करणार आहे.मुस्लिम बहुल भागातुन मतदानाची टक्केवारी वाढावी म्हणून आज नागपूरी गेट, गवळीपूरा, लालखडी,पठाण चौक या भागातुन बाईक रॉली काढण्यात आली,या रॉलित शेकडो कर्मचारी सहभागी झाले होते.

प्रचारात ‘इव्हेंट मॅनेजमेंट’; पदयात्रा व सभांवर उमेदवारांचा अधिक भर

सकाळपासूनच संवाद : पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या हालचालींवर लक्ष

अरुण जोशी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.८अमरावती

अमरावती जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदारसंघांसाठी प्रचाराने वेग घेतला आहे. गावागावात प्रचाराच्या गाड्यांचा धुराळा उडतो आहे. प्रत्येक गावात भेट देण्याचे नियोजन आखले गेले आहे. त्यासाठी बहुतेक सर्वच उमेदवारांनी प्रचारासाठी ’इव्हेंट मॅनेजमेंट’वर लक्ष केंद्रीत केले आहे. परंतु, पक्षांतर्गत वाढलेल्या बंडखोरीमुळे कार्यकर्ते, तसेच पदाधिकाऱ्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी उमेदवारांनी विशेष पथक तैनात केले आहेत. सकाळपासून मतदारांशी संवाद साधला जात आहे. पदयात्रा, सभा व छोटेखानी सभांवर भर दिला जात आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी सोमवारी नामांकन मागे घेण्यात आले अन् उमेदवारांना चिन्ह घोषित झाले. मंगळवारपासून जिल्ह्यातील सर्वच मतदारसंघांत प्रचाराचा धुरळा उडायला लागला आहे.राजकीय पक्षांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांवर प्रचारादरम्यान घडणाऱ्या घडमोडीवर लक्ष ठेवण्याची विशेष जबाबदारी सोपविण्यात आली आहे. कोण कामाला लागले, कोण दुसरीकडे प्रचार करतोय, आपल्या तंबूत किती वाढले, याची बारकाईने तपासणी केली जात आहे. शहरांप्रमाणे गावखेड्यातही सकाळपासून प्रचार वाहनांची धूम सुरू आहे. प्रचार वाहन गावखेड्यात पोहोचली आहेत.

जेष्ठांचा आशीर्वाद

आपल्या विजयाच्या मार्गात कुठलाही अडसर राहू नये, कुणाची नाराजी भोवू नये, यासाठी उमेदवारांनी ज्येष्ठांचे आशीर्वाद घेण्यास सुरुवात केली आहे. कधीही ज्यष्ठांसोबत संवाद न साधणारे व त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी वेळ न देणारे आता त्यांच्या पाया पडून आपला आशीर्वाद द्या, अशी विनवणी करीत आहे.

कमी दिवसांत मतदारांशी संपर्काची रणनीती

यंदा उमेदवारांना प्रचारासाठी केवळ ११ दिवस मिळणार आहेत. सुरुवातीचे दोन ते तीन दिवस जुळवाजुळवीत गेले. त्यामुळे उमेदवारांना अधिक श्रम घ्यावे लागत आहे. त्यामुळे कमी दिवसांत अधिक मतदारांना आकर्षित करण्यासाठी रणनीती आखली जात आहे.

सभांच्या गर्दीसाठी समर्थकांची धावपळ

उमेदवारांनी यंत्रणा प्रचार साहित्य, जाहीरनामा, निवडणूक चिन्ह, उमेदवारांचे आवाहन थेट मतदारांच्या दारापर्यंत पोहोचविण्यासाठी कामाला लागली आहेत. उमेदवारांच्या रॅली, पदयात्रा, सभा, कॉर्नर बैठकांसाठी कार्यकर्ते, समर्थकांची गर्दी जमविण्यासाठी धावतळ वाढली आहे.

अचलपूर बाजार समितीचा लेखापाल सेवेतून बडतर्फ

स्पीड पोस्टने नोटीस, बाजार समितीने आचारसंहिता भंग केल्याची तक्रार

कृषि उत्पन्न बाजार समिती अचलपूर

विदर्भ प्रजासत्ताक
दि.८परतवाडा

ऐन दिवाळीच्या तोंडावर विधानसभेच्या आचारसंहिता दरम्यान अचलपूर बाजार समितीने निलंबित लेखापालाला सेवेतून बडतर्फ केले. २०२०-२१ आणि २०२१-२२ या वर्षातील आर्थिक अनियमिततेचा ठपका ठेवत २६ ऑक्टोबरच्या सभेत हा बडतर्फीचा निर्णय संचालक मंडळाने घेतला आहे.

बडतर्फ लेखापाल यांची नोटीस प्रभारी सचिवांनी स्पीड पोस्टाने बजावली. संबंधित लेखापाल आजारी असल्यामुळे ते परतवाड्यातील खासगी रुग्णालयात औषधोपचार घेत होते. यादरम्यान त्यांच्या सुटीचा अर्ज घेऊन मुलगा बाजार समितीच्या कार्यालयात पोहोचला तेव्हा त्याला हा प्रकार कळला. मुलाने वडिलांच्या बडतर्फीची नोटीस घेण्यास नकार दिल्यावरून स्पीड पोस्टाने ती पाठविण्यात आल्याचे प्रभारी सचिवांनी स्पष्ट केले.

दरम्यान, बडतर्फ लेखापालांवर लेखापरीक्षणात गंभीर आरोप आहेत. स्वतंत्र चौकशी पथकात दोषी आढळले आहेत. खोटे पावती बुक छापून लाखो रुपयांची वसुली केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. खुलाशात समाधानकारक उत्तर मिळू शकले नसल्याने कारवाई झाली, अशी माहिती सभापती राजेंद्र गोरले यांनी दिली.

> २६ ऑक्टोबरच्या सभेत कुठलाही धोरणात्मक निर्णय झाला नाही. आचारसंहितेपूर्वी पार पडलेल्या बाजार समितीच्या सर्वसाधारण सभेत ठरवले गेलेले विषय सभेत घेतले गेले. ही सभा प्रशासकीय कामकाजाचा भाग होती. त्यात आचारसंहितेचा भंग नाही.
>
> **– योगेश चव्हाण,**
> **प्रभारी सचिव. अचलपूर बाजार समिती**

आचारसंहितेचा भंग

विधानसभा निवडणूक आचारसंहिता दरम्यान अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीची २६ ऑक्टोबरला पार पडलेली संचालक मंडळाची सभा आचारसंहितेचा भंग करणारी ठरली असल्याची तक्रार संबंधित लेखापालांनी अचलपूर निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यासह जिल्हाधिकारी, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सहायक निबंधक सहकारी संस्था अचलपूर, तहसीलदार, उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्याकडे ७ नोव्हेंबरला केली आहे.

कारवाईची मागणी

सभेच्या नोटिसवर प्रभारी सचिवांनी धोरणात्मक विषय विषयसूचीवर घेऊन १५ संचालकांसमक्ष विविध धोरणात्मक विषयांवर चर्चा करून ठराव पारित केले. याच सभेत दोन लाभार्थींना प्रत्येकी पाच हजार रुपयांप्रमाणे देणगी खर्चाचे धनादेश दिले. मयत व्यक्तीच्या नावेसुद्धा देणगी दिली गेली. हे आचारसंहितेचे उल्लंघन असून कार्यालयीन दस्ताऐवज जप्त करून याबाबीची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी तक्रारकत्याने केली आहे.

‘वॉल ऑफ प्राऊड’ ठरतेय प्रेरणादायी : जिल्हा परिषदेच्या प्रवेश द्वारावर मतदान जनजागृतीची चित्र प्रदर्शनी

विदर्भ प्रजासत्ताक दि.८मांजरखेड

राज्यातील विधानसभा निवडणुकीला अवघे अकरा दिवस शिल्लक आहे. निवडणुकीत उभे असलेल्या उमेदवारसोबतच जिल्हा परिषद प्रशासन सुध्दा निवडणुकीची टक्केवारी वाढण्यासाठी विविधांगी प्रयोगांची मालिका राबवित आहे. जिल्ह्याच्या मिनी मंत्रालयात येणाऱ्या प्रत्येक नागरिकास मतदान करण्याची प्रेरणा मिळावी यासाठी जिल्हा परिषदेच्या प्रवेश द्वारापासून ते आतपर्यंत ३४ विविध प्रेरणादायी पोस्टर प्रदर्शनी लावली आहे.

एखादा कलावंत ज्याप्रमाणे त्याची कला कॅनव्हासपेपर वर साकारून त्याच्या कलेची प्रदर्शनी भरवतो. त्याच धर्तीवर या पूर्वीच्या लोकसभा निवडणुकीत व या निवडणुकीसाठी प्रेरणादायी कार्य करणाऱ्या व्यक्तीची व सामाजिक संघटनांची दखल जिल्हा परिषदेने घेतली. मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र व स्विय सहायक ज्ञानेश्वर घाटे यांच्या संकल्पनेतून ’वॉल ऑफ प्राऊड’ निर्माण करण्यात आले. यामध्ये जिल्ह्याचे निवडणूक अधिकारी, समाजातील बचत गटातील काम करणाऱ्या महिला, दिव्यांग मतदारांना मतदानासाठी सहकार्य करणारे वॉरियर्स, ईव्हीएम द्वारा मतदान कसे करायचे या बाबत मार्गदर्शन करणारे स्वयंसेवक, महिला दिनाच्या औचित्यावर रॅली काढणाऱ्या रणरागिणी, मतदानासाठी सजगतेने कर्तव्य निभावणारे पोलीस बांधव, ग्रामीण व शहरी भागातील अंगणवाडीताईंचा पिंक फोर्स, पथनाट्य करणारे रंगकर्मी, बीएलओ म्हणून काम करणारे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, स्वीप अभियानातील कर्मचारी, गुलाबी मतदान केंद्रातील कर्मचारी,तसेच मतदानाला प्रेरित करणारे स्लोगन आदी विविध ३४ पोस्टर ची प्रदर्शनी भरविण्यात आली आहे. प्रवेशपासून ही खुली ’वॉल ऑफ प्राऊड’ प्रदर्शन सह निवडणूक विभागद्वारा अठरावे वरीस मोक्याचं, इथे सर्व बोटे सारखीच असे जनजागृती करणारे मोठे बॅनर झळकले आहे.यात सांध्य मराठी दैनिक विदर्भ प्रजासत्ताक चा ही वाटा आहे.

तथा जिल्हाधिकारी, अमरावती
सार्वत्रिक निवडणूक -२०२४
SVEEP
Proud Voters
Go Vote
SVEEP नोडल अधिकारी, अमरावती

अमरावतीचा वोटोबा ठरतोय चर्चेचा विषय

अमरावती जिल्ह्यातील मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी प्रत्येक स्वीप नोडल अधिकारी द्वारा सर्वात कमी मतदान झालेल्या भागात जनजागृतीवर विशेष भर देण्यात येत आहे. स्वीप कक्ष अंतर्गत अमरावतीत वोटोबा हा सर्वत्र चर्चेचा विषय ठरत आहे. जिल्ह्यातील अनेक कर्मचाऱ्यांच्या स्टेटस वर वोटोबासह येत्या २० नोव्हेंबर ला ’मी मतदान करणार’ असल्याचे नवनवीन पोस्ट झळकत आहे.

आता नेत्यांना आली जुन्या नात्यांची आठवण

विदर्भ प्रजासत्ताक
दि.८ अमरावती

विधानसभा निवडणुकीचे उमेदवार निश्चित झाल्यानंतर गावागावांत प्रचाराला वेग आला आहे. जुन्या कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी हे उमेदवार आवर्जून घेत आहेत. अशातच ते आपले तुमच्या कुटुंबाशी कसे जुने व जिव्हाळ्याचे संबंध आहेत, हे आवर्जून सांगत आहेत. काका, काकू, मावशी, आत्या, मामी, आजी, आजोबा अशा नात्यांची गुंफण करत मनधरणी करत मते आहेत.

जिल्ह्यात आठ विधानसभा मतदारसंघ आहेत. या मतदारसंघांतील निवडणूक अतिशय रंगतदार व तेवढीचचुरशीची होणार आहे. उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर आता चित्र स्पष्ट झाल्यामुळे निवडणुकीच्या आखाड्यात उतरलेल्या उमेदवारांनी मिळवण्यासाठी विविध उपाययोजनांवर काम सुरू केले आहे. प्रमुख राजकीय पक्षाच्या उमेदवारांची प्रचाराची पहिली फेरी पूर्ण झाली आहे. यामुळे प्रत्येक गावात असलेल्या तरुण कार्यकर्त्यांना व्यवस्थित पद्धतीने हाताळावे लागत आहे. एखाद्या दिवशी एखादा कार्यकर्ता आपल्याकडे नाही आला, तर लगेच त्याच्या अपेक्षा जाणून घेऊन पूर्ततेसाठी प्रयत्नही केले जात आहेत.